# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | गुरुवार । दि. २० ऑगस्ट २०२६ । अंक ७५ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## ‘शिवसेना पक्ष आणि चिन्ह गोठवा’

**नवी दिल्ली :** देशाचं लक्ष लागलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी अंतिम टप्प्यात आली आहे. ठाकरेंच्या शिवसेना पक्षाच्यावतीने वकील कपिल सिब्बल प्रभावी बाजू मांडत आहेत. आत्तापर्यंत शिवसेना पक्ष आणि चिन्ह हे उद्धव ठाकरेंनाच दिले पाहिजे, अशी मागणी सिब्बल न्यायालयात करत होते. मात्र, पहिल्यांदाच कपिल सिब्बल यांनी शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याची मागणी केली आहे. त्यामुळे, राजकीय वर्तुळातील अनेकांच्या भुवया उंचावल्या असून न्यायालयाच्या निर्णयाकडे सर्वांचे पान २ वर

## रंजित दळवीला जामीन मंजूर

**पेण :** उद्योजक मयुर वनगे मारहाण प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणातील आरोपी रंजित दळवी याला जिल्हा सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. मात्र, या जामीन आदेशाविरोधात मयुर वनगे उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील अन्य आरोपी दक्षिण रायगड भाजप उपाध्यक्ष मंगेश दळवी, हरेश दळवी आणि रूपेश दळवी यांनी अद्याप जिल्हा सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केलेला नाही. मात्र, आरोपी रंजित दळवीला जामीन मिळाल्याने या तिन्ही आरोपींकडूनही आता जामिनासाठी पान २ वर

# ‘एसआयआर’ संपले आता ‘एआय’ची सक्ती

### एससीईआरटीचे शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र
### मुख्याध्यापक, शिक्षकांना ५० तासांच्या प्रशिक्षणाचे बंधन

| सुयोग आंग्रे|
| रायगड |

मतदार पुनरीक्षणाचे काम १७ ऑगस्टला संपले. त्याच दिवशी इयत्ता पहिली ते बारावीच्या वर्गांवरील शिक्षकांना ५० तासांचे एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) प्रशिक्षण पूर्ण करायचे असल्याचे पत्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) काढले आहे. ३० सप्टेंबरपूर्वी सर्व शिक्षकांना आता हे प्रशिक्षण पूर्ण करावे लागणार आहे.

इयत्ता पहिली ते बारावीच्या वर्गांवर अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांना एआय साथी फॉर एज्युकेटर्स हा ऑनलाईन कोर्स करावा लागणार आहे. ३१ ऑगस्टपर्यंत सर्वच शिक्षकांना नोंदणी करावी लागणार आहे. अजूनही लाखो शिक्षकांनी कोर्ससाठी नोंदणी केलेली नाही, दुसरीकडे नोंदणी करूनही अनेकांनी प्रशिक्षण पूर्ण केलेले नाही. त्यामुळे आता पान २ वर




**रायगड जिल्ह्यातील स्थिती**

| | |
|---|---|
| प्रशिक्षणास अपेक्षित शिक्षक | 16748 |
| नोंदणी केलेले शिक्षक | 6384 |
| नोंदणी न केलेले शिक्षक | 10364 |
| नाव नोंदणीसाठी मुदत | 30 ऑगस्ट |
| प्रशिक्षणासाठी मुदत | 30 सप्टेंबर |

**३० तासांचे ऑनलाईन अन् २० तासांचे ऑफलाईन प्रशिक्षण**

इयत्ता पहिली ते बारावीच्या वर्गास शिकवणाऱ्या शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा लागणार आहे. शिक्षकांना एआयचा वापर सहजपणे करता यावा या हेतूने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून सर्व शिक्षकांना ३० तास ऑनलाईन प्रशिक्षण घ्यावे लागणार आहे. २० तास प्रशिक्षण वर्षभरात ऑफलाईन घ्यावा लागणार आहे.

> “विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांना एआयची प्राथमिक माहिती असावी म्हणून पहिली ते बारावीच्या वर्गांवरील सर्व शिक्षकांसाठी हा कोर्स करावा लागणार आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या पत्रानुसार शिक्षकांनी कोर्ससाठी मुदतीत नोंदणी करून कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे. रायगड जिल्ह्यात असणाऱ्या शिक्षक संख्येच्या तुलनेत नोंदणी करणाऱ्या शिक्षकांची संख्या कमी आहे. नोंदणी न केलेल्या शिक्षकांनी तातडीने नोंदणी करून एआयचे प्रशिक्षण पूर्ण करावे.”
>
> –रत्नप्रभा भालेराव, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रायगड

## वेधक

### पांडवकड्याने घेतला आठवड्यात दुसरा बळी!

**पनवेल :** खारघर येथील प्रसिद्ध पांडवकडा धबधब्यावर पुन्हा एकदा बुडून मृत्यूची घटना घडली असून, १६ वर्षीय प्रणव मिश्रा या तरुणाचा दुर्दैवी अंत झाला. १९ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. विशेष म्हणजे, अवघ्या सहा दिवसांपूर्वी याच परिसरात २३ वर्षीय आदित्य विश्वकर्मा याचा बुडून मृत्यू झाला होता. त्यामुळे आठवडाभरात दोन बळी गेल्याने पांडवकडा परिसरातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

१९ ऑगस्ट रोजी सकाळी पावणे सहाच्या सुमारास पांडवकडा धबधब्यात एक जण बुडाल्याची माहिती खारघर अग्निशामक केंद्राला मिळाली. माहिती मिळताच अग्निशामक दलाचे जवान फायर जीपसह घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी धबधब्यात मोठ्या प्रमाणात पाण्याचा पान २ वर

## गर्भवतीला झोळी, नेत्यांना ‘रिल्स’ची चिंता!

### आश्वासनांचा हिशोब मागणाऱ्या ग्रामस्थांचा सवाल

| खोपोली | प्रतिनिधी |

एकीकडे विकासाच्या दाव्यांचा गजर आणि दुसरीकडे स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही गर्भवती महिलेला उपचारासाठी झोळीतून नेण्याची वेळ...खालापूर तालुक्यातील उंबरणेवाडीतील हे वास्तव समाज माध्यमांवरील व्हिडिओमुळे समोर आले आहे. या परिस्थितीवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या तरुणांच्या रिल्सवर आम्हाला त्या रिल्सचा काही फरक पडत नाही, परिणाम होत नाही, असे उरणचे आमदार महेश बालदी यांनी कथितरीत्या म्हटल्याने आदिवासी ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

उंबरणेवाडी, आरकसवाडी आणि पीरकडवाडी या दुर्गम वाड्यांतील नागरिकांसाठी आजही रस्ता हीच सर्वात मोठी समस्या आहे. पावसाळ्यात डोंगर-दऱ्यांमधून वाट काढत रुग्णांना मुख्य रस्त्यापर्यंत आणावे लागते. गर्भवती महिलेलाही झोळीतून दवाखान्यात नेण्याची वेळ येत असेल, तर विकासाच्या दाव्यांचे



मोजमाप नेमके कुठे करायचे, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

दोन वर्षांपूर्वी आ. बालदी नवरात्रोत्सवासाठी वाडीत आले होते. देवीसमोर शपथ घेऊन रस्ता आणि वीज देण्याचे आश्वासन दिले होते. त्या शपथेचे पान २ वर

## लॉकपमध्ये ठेवताना आरोपीचे पलायन

**पनवेल :** न्यायालयात हजर करून आरोपीला पोलीस ठाण्यात आणले असता कळंबोली पोलीस ठाण्यातून आरोपी पळाल्याची घटना घडली. कळंबोली पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून त्याला पुणे येथून अटक केली. चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी इरफान मोहम्मद जाकीर शेख मन्सुरी उर्फ मँगो याला कळंबोली पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यात अटक केली होती. या आरोपीला कळंबोली पोलिसांनी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी दिल्यानंतर दुपारी चारच्या सुमारास त्याला पोलीस कोठडीत ठेवत असताना तो तेथून पळून गेला. त्यानंतर पोलीस ठाण्यात एकच गोंधळ उडाला. आरोपी पळून गेल्याने पकडण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते.

## जुन्या पंचायत समितीची इमारत बनली धोकादायक

### कर्मचारी, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील विविध गावांनापाणीपुरवठाकरणाऱ्याजिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंता कार्यालयासह तालुका सार्वजनिक आरोग्य विभागाचे कार्यालय सध्या अक्षरशः पाण्याच्या विळख्यात सापडले आहे. जुन्या पंचायत समितीच्या आवारातील या इमारतीभोवती पावसाचे पाणी साचत असल्याने नागरिक आणि कर्मचाऱ्यांना चिखल-पाण्यातून वाट काढत कार्यालयात जावे लागत आहे. वर्षानुवर्षे ही समस्या कायम असूनही संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि प्रशासनाचे त्याकडे गांभीर्याने लक्ष नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

जुन्या पंचायत समितीची ही इमारत आधीच जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या अवस्थेत



आहे. त्यातच आवारात पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी प्रभावी व्यवस्था नसल्याने पाणी मोठ्या प्रमाणात तुंबते. अनेक दिवस पाणी साचून राहिल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी, अस्वच्छता आणि डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे आरोग्य विभागाचे कार्यालयच अशा अस्वच्छ आणि आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या वातावरणात सुरू असल्याने कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पान २ वर

## उद्योगांची भरारी, स्थानिकांच्या हातात बेरोजगारी!

### गोदरेज-टाटा व्यवस्थापनाविरोधात सुधाकर घारेंचा एल्गार

| खोपोली | प्रतिनिधी |

रायगडमध्ये मोठमोठे औद्योगिक प्रकल्प उभे राहत असताना स्थानिक तरुण-तरुणींना मात्र रोजगारासाठी वणवण करावी लागत असल्याची विसंगती पुन्हा ऐरणीवर आली आहे. उद्योगांसाठी स्थानिकांच्या जमिनी आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर होत असेल, तर त्याचा पहिला लाभ स्थानिकांना रोजगाराच्या रूपाने मिळायला हवा, अशी मागणी जोर धरत आहे.

याच मुद्द्यावर सुधाकर घारे यांनी आक्रमक भूमिका घेत गोदरेज आणि टाटा व्यवस्थापनाला जाब विचारण्याचा इशारा दिला आहे. रायगडच्या औद्योगिक पट्ट्यात



उद्योगांचा विस्तार झाला आहे. अनेक प्रकल्पांसाठी स्थानिकांच्या जमिनी संपादित झाल्या, तर परिसरातील पायाभूत सुविधा आणि नैसर्गिक संसाधनांचा उद्योगांसाठी वापर केला जात आहे. त्यामुळे या औद्योगिक विकासाचा स्थानिक नागरिकांना नेमका किती फायदा झाला, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

शिक्षण पूर्ण करून पदवी हातात घेतलेल्या स्थानिक युवापिढीसमोर रोजगाराचे संकट कायम आहे. कंपन्यांमध्ये नोकरी मिळवण्यासाठी अर्ज, मुलाखती आणि रोजगार मेळाव्यांची धावपळ करूनही अपेक्षित संधी मिळत नसल्याची भावना स्थानिकांमध्ये आहे. त्यामुळे उद्योग रायगडमध्ये, मग रोजगारासाठी आमच्या मुलांनी दुसऱ्या शहराची वाट का धरावी? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. औद्योगिक प्रकल्पांसाठी स्थानिकांच्या जमिनी घेतल्या जात असतील, तर त्या प्रकल्पांमध्ये स्थानिकांना रोजगारासाठी प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. कंपन्यांनी स्थानिकांसाठी स्वतंत्र रोजगार धोरण आखावे, कौशल्य प्रशिक्षण द्यावे आणि पात्र स्थानिक उमेदवारांना संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे. या प्रश्नात स्थानिक तरुणींच्या रोजगाराचाही मुद्दा महत्त्वाचा आहे. शिक्षण पूर्ण केलेल्या अनेक तरुणींना सुरक्षित आणि जवळच्या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नसल्याने त्यांना रोजगारापासून दूर राहावे लागत आहे. त्यामुळे औद्योगिक आस्थापनांनी महिलांसाठी सुरक्षित, कौशल्याधारित आणि दीर्घकालीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची मागणीही पुढे येत आहे. उद्योगांना विरोध नाही; मात्र उद्योगांच्या पान २ वर

## चिमुकलीवर अत्याचार करून हत्या

**जुन्नर :** चिमुकलीवर अत्याचार अन त्यानंतर झालेल्या हत्येने पुणे जिल्हा पुन्हा हादरला आहे. जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडीत नराधमाने हे संतापजनक कृत्य केले. चिमुरडीला सायकल शिकवण्याचा बहाणा करुन हा नराधम मुलीला ऊसाच्या शेतात घेऊन गेला. मुलीचे आई-वडील शेतात मजुरीसाठी गेले होते. पीडित मुलगी कांजण्या आल्यामुळे शाळेत गेली नव्हती. ती एकटीच घरी असताना नराधमाने डाव साधला. त्यानंतर मुलीचे आई-वडील घरी आल्यावर त्यांनी मुलीची पान २ वर

## आता प्रत्येक सर्पदंशाची नोंद होणार

### ■ अधिसूचित आजार म्हणून झाली वर्गवारी

| रायगड | प्रतिनिधी |

राज्यातील सर्पदंशामुळे होणारे मृत्यू आणि अपंगत्व रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने सर्पदंशाचा अधिसूचित आजार म्हणून समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील सरकारी तसेच खासगी रुग्णालयांना सर्पदंशाच्या प्रत्येक संशयित, संभाव्य किंवा निश्चित घटनेची तसेच त्यातून झालेल्या मृत्यूची नोंद करणे बंधनकारक होणार आहे.

सर्पदंशाच्या घटनांची अचूक आकडेवारी उपलब्ध झाल्याने उपचार व्यवस्था, सर्पविष प्रतिबंधक लस (एएसव्ही) आणि



प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. सर्पदंशामुळे होणारी विषबाधा ही संभाव्य जीवघेणी स्थिती आहे. अशा वेळी वेळेत निदान, योग्य प्रथमोपचार, रुग्णाला तातडीने रुग्णालयात दाखल करणे आणि गरजेनुसार पान २ वर

## चार कोटींचा गाळ कुणाच्या घशात?

### ■ ठेकेदाराला ९० टक्के बिल; काम अपुरे ठेवून अभय दिल्याचा आरोप

| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरानच्या ऐतिहासिक शार्लोट लेकच्या गाळमुक्तीच्या कामावरून आता कोट्यवधी रुपयांचा संशय गडद झाला आहे. सुमारे पाच कोटी रुपयांच्या कामात ठेकेदाराला तब्बल ९० टक्के रक्कम अदा करण्यात आली असतानाही अपेक्षित काम पूर्ण झाले नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे चार कोटींचा गाळ कुणाच्या घशात? असा थेट सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शारलोट लेकच्या पुनरुज्जीवनासाठी अमृत-२.० अभियानांतर्गत पाच कोटी रुपयांच्या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. शासनाच्या कागदपत्रांनुसार पान २ वर

> “दरवर्षी आम्ही पावसाळ्यात याठिकाणी केवळ लेकच्या पाण्याखाली भिजण्याचा आनंद घेण्यासाठी येतो. परंतु इथल्या कोरड्या लेकची परिस्थिती पाहून डोके अक्षरशः चक्रावून गेले. आमच्या आनंदावर विरजण पडल्यामुळे आमचे सर्व सहकारी नाराज झाले आहेत.”
>
> – नवनाथ शिर्के, पर्यटक, मुंबई

> “आपली अनमोल किंमतीची गाळयुक्त माती या लेकमधून खाली सोडण्यात आली आहे. खाली मोरबे धरणात हा गाळ जाणार असल्याने आपल्याला यापुढे रस्त्यांची कामे करताना माती मिळणार नाही. आपले पर्यावरण, निसर्ग यामुळे इथे पर्यटक येत असतात. ठेकेदाराने यापुढे माती पाण्यात सोडून देऊ नये. आमच्या गावासाठी या मातीची खूपच गरज आहे.”
>
> – मेहुल राकेश कोकळे, माथेरान

## पालीतील आढावा बैठकीत तक्रारींचा पाऊस

### ■ अधिकाऱ्यांची उत्तर देताना दमछाक; जलजीवन मिशनसह अनेक मुद्दे ऐरणीवर

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील विकासकामे, प्रलंबित प्रश्न आणि नागरिकांच्या विविध अडीअडचणींचा आढावा घेण्यासाठी पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत तक्रारींचा अक्षरशः पाऊस पडला.

अनेक प्रश्नांवर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने बैठकीत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.



दरम्यान, आमदार अनिकेत तटकरे यांनी बैठक सकारात्मक पद्धतीने हाताळत अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना व निर्देश दिले.

पंचायत पान २ वर

### ‘मला खऱ्या पप्पांकडे जायचंय’ निरागस शब्दांनी घेतला जीव

# सावत्र पित्याच्या क्रौर्याने उरण हादरले

| घन:श्याम कडू |
| उरण |

अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकल्याच्यातोंडूननिघालेले ‘मला माझ्या खऱ्या पप्पांकडे जायचंय’ हे निरागस शब्द त्याच्यासाठी अखेरचे ठरले. फणसवाडी (मोरा) येथे सावत्र पिता जितेंद्र प्रदीप भिसे (२८) याने मोक्ष या चिमुकल्याची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या अमानुष कृत्याने उरण हादरले आहे. चिमुकल्याच्या हत्येची बातमी समोर येताच परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

हत्येनंतर आरोपीने मुलगा पलंगावरून पडून जखमी झाला असा बनाव रचत पोलिसांची दिशाभूल करण्याचा आणि पोलिसांना न कळवता परस्पर अंत्यसंस्कार उरकण्याचा प्रयत्न केला. मात्र मोरा सागरी पोलिसांची सतर्कता आणि शवविच्छेदन अहवालामुळे आरोपीचा हा डाव फसला. मृत मोक्ष (वय ३ वर्षे ५ महिने) हा आई काव्या आणि तिचा दुसरा पती जितेंद्र भिसे यांच्यासोबत फणसवाडी येथे राहत होता. पान २ वर

**शवविच्छेदनाने आरोपीचा खोटारडेपणा उघडा**

माहिती मिळताच मोरा सागरी पोलिसांचे पथक फणसवाडी येथे दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र १५ ऑगस्ट रोजी प्राप्त झालेल्या शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालात मोक्षच्या डोक्याला गंभीर दुखापत, बरगड्यांचे फ्रॅक्चर आणि जबर मारहाणीचे पुरावे आढळून आले. वैद्यकीय अहवालाने पलंगावरून पडल्याची आरोपीची कहाणी अक्षरशः खोटी ठरवली. त्यानंतर पोलिसांच्या तपासात आरोपीची कोंडी होताच त्याने हत्येची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**हत्या करून अपघाताचा बनाव**

मोक्षचा मृत्यू झाल्यानंतर आरोपीने गुन्हा लपविण्यासाठी मुलगा घरात खेळताना पलंगावरून खाली पडला आणि बेशुद्ध झाला असा बनाव रचला. त्यानंतर मोक्षला उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून दुपारी चार वाजता त्याला मृत घोषित केले. मुलाचा मृत्यू झाल्यानंतरही आरोपीने पोलिसांना माहिती न देता आणि शवविच्छेदन न करता परस्पर अंत्यसंस्कार करण्याची घाई सुरू केली. याच हालचालींमुळे पोलिसांना संशय आला.

**बालहत्येचा पर्दाफाश**

अपघाताचा बनाव रचून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जितेंद्र प्रदीप भिसे याला पोलिसांनी अटक केली आहे. हत्या तसेच बाल न्याय कायद्यानुसार त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल कटवाणी यांनी दिली असून न्यायालयाने आरोपीला २० ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. अवघ्या साडेतीन वर्षांच्या निष्पाप जीवाचा अशा अमानुष पद्धतीने अंत झाल्याने उरण परिसर हादरला असून, या क्रूर कृत्यामागील प्रत्येक पैलूचा सखोल तपास करून दोषीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशी संतप्त मागणी होत आहे.




# विधि अभ्यासक्रम प्रवेशाची यादी जाहीर

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षातर्फे पाच वर्षीय विधि अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची पहिली यादी मंगळवारी जाहीर करण्यात आली. या यादीत १५ हजार ९१३ विद्यार्थ्यांपैकी ८ हजार १३५ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली. राज्यातील १६२ विधी महाविद्यालयांमधील १० हजार ७७१ जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली.यंदा विधि प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयांच्या नोंदणीचा घोळ झाल्याने सुरुवातीपासूनच प्रवेश प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. महाविद्यालये आणि उपलब्ध जागांची माहिती अंतिम टप्प्यात स्पष्ट झाल्याने विद्यार्थ्यांच्या पसंतीक्रम ावरही त्याचा परिणाम झाला. अखेर १६२ महाविद्यालयांतील उपलब्ध जागांचा विचार करून पहिली यादी जाहीर करण्यात आली. पाच वर्षीय विधि अभ्यासक्रमासाठी एकूण १८ हजार ४९९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. मात्र, दिलेल्या मुदतीत १५ हजार ९१३ विद्यार्थ्यांनीच महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरले. त्यामुळे पहिल्या फेरीसाठी याच विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आला. पहिल्या फेरीत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना १९ ते २१ ऑगस्टदरम्यान संबंधित महाविद्यालयात प्रत्यक्ष हजर राहून कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. शुल्क भरल्यानंतरच प्रवेश निश्चित होणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठी बी. आर्किटेक्चर अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची दुसरी यादी मंगळवारी जाहीर करण्यात आली. या फेरीत २ हजार ७ विद्यार्थ्यांनी पसंती नोंदवली असून त्यापैकी ७२८ नवीन विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली आहे, तर ८९३ विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या पहिल्या तीन पसंतीपैकी एका महाविद्यालयात जागा मिळाली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित म्हणजे ऑटो फ्रीझ झाले आहेत. पहिल्या फेरीत जागावाटप झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १ हजार १८३ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जाऊन प्रवेश घेतला. तर ९७० विद्यार्थ्यांनी बेटरमेंटचा पर्याय निवडला आहे. दुसऱ्या फेरीत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांनी १८ ते २० ऑगस्टदरम्यान संबंधित महाविद्यालयात प्रत्यक्ष हजर राहून आवश्यक कागदपत्रे सादर करून शुल्क भरावे आणि प्रवेश निश्चित करावा.

# राडारोडा टाकणाऱ्या दोन डंपर चालकांवर गुन्हा दाखल

। उरण । प्रतिनिधी ।

उलवे परिसरामध्ये अनधिकृतपणे राडारोडा (डेब्रिज) टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन डंपर चालकांवर उलवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिडकोच्या दक्षता पथकाने आणि न्हावा शेवा वाहतूक विभागाच्या पोलिसांनी संयुक्त कारवाई करत या दोन्ही डंपर चालकांना रंगेहाथ पकडले.

मिळालेल्या माहितीनुसार उलवे सेक्टर १२ मधील अटल सेतूपुलाखाली दोन डंपरचालक बेकायदेशीरपणे राडारोडा टाकण्यासाठी घेऊन जात असल्याचे सुरक्षा रक्षकांच्या निदर्शनास आले. न्हावा शेवा वाहतूक विभागाचे पोलीस हवालदार गोंधळी, पोलीस नाईक केदार आणि पोलीस शिपाई चव्हाण यांनी महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या रक्षकांसह तात्काळ या डंपर चालकांना ताब्यात घेतले.

या कारवाईत मुन्ना खान (वय ४८, रा. अँटॉप हिल) आणि अमजद अली (वय ४४, रा.वडाळा ईस्ट) या दोन डंपर चालकांना वाहनांसह ताब्यात घेण्यात आले आहे. हे दोघे डंपरद्वारे उलवे परिसरात अनधिकृतपणे डेब्रिज टाकण्याचा प्रयत्न करत होते. सिडकोचे सहाय्यक कार्यकारी अभियंता भूषण भगवान पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरून उलवा पोलिसांनी भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश काशिनाथ पाटील करत आहेत.

पान १ वरून

## गर्भवतीला झोळी, नेत्यांना 'रिल्स'ची चिंता!

काय झाले? असा थेट सवाल ग्रामस्थांनी केला आहे. इरशाळवाडी दुर्घटनेनंतर या परिसरातील वाड्यांना रस्त्याची सुविधा मिळेल, अशी आश्वासने देण्यात आली होती. मात्र, अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. त्यामुळे आश्वासनांच्या घोषणा झाल्या; मात्र रस्त्यासाठी दगडही पडला नाही, अशी खंत ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.समाजमाध्यमांवर व्हिडिओ प्रसारित करणाऱ्या तरुणांवर प्रतिक्रिया देण्याऐवजी वाडीतील मूलभूत प्रश्न सोडवावेत, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. आम्ही ज्या परिस्थितीत दिवस काढत आहोत, ते दिवस तुम्ही काढू शकत नाही, अशा शब्दांत ग्रामस्थांनी आम दारांना सुनावले. आम्ही एवढे व्हिडिओ बनवले, ते आमदारांपर्यंत पोहोचले असतील. मात्र, एकदाही प्रतिसाद मिळाला नाही. इतर आमदार तातडीने प्रतिक्रिया देतात, अशी नाराजीही व्यक्त करण्यात आली. आमदार फक्त निवडणुकीपुरते येतात, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. इरशाळवाडीला वीज देण्याच्या दाव्यावरही ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, तेथे फाउंडेशनच्या माध्यमातून वीज उपलब्ध झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. एकीकडे आधुनिक महामार्ग, मोठे प्रकल्प आणि विकासकामांचे दावे केले जात असताना दुसरीकडे त्याच मतदारसंघातील आदिवासी वाडीत गर्भवती महिलेला झोळीतून दवाखान्यात न्यावे लागत आहे. त्यामुळे उंबरणेवाडीचा व्हिडिओ हा केवळ एक रिल्स नसून, विकासाच्या दाव्यांसमोर उभा राहिलेला आरसा आहे, अशी संतप्त भावना ग्रामस्थांमध्ये आहे. आमदार बालदी यांच्या कथित रिल्सचा परिणाम होत नाही या वक्तव्यामुळे प्रश्न सुटण्याऐवजी तो अधिक तीव्र झाला असून, आता ग्रामस्थांना आश्वासन नव्हे तर प्रत्यक्ष रस्ता आणि वीज कधी मिळणार, याचे उत्तर अपेक्षित आहे.

## आता 'एआय'ची सक्ती

राहिलेल्या शिक्षकांनी ३१ ऑगस्टपूर्वी नोंदणी करावी आणि ३० सप्टेंबरपूर्वी कोर्स पूर्ण करावा लागणार आहे. कोर्ससाठी चार तासांचे सीपीडी (प्रगतीशील विकास) प्रशिक्षण श्रेय निश्चित करण्यात आले आहे. तरी, आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांना आवश्यक सूचना करून सर्व शिक्षकांची नोंदणी करून कोर्स वेळेत पूर्ण करून घ्यावे, असे पत्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या सहसंचालिका डॉ. कमलादेवी आवटे यांनी काढले आहे. ते पत्र सर्व विभागीय उपसंचालक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (डाएट) प्राचार्य, महापालिकेचे प्रशासनाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे. मुख्याध्यापकांनाही प्रशिक्षण पूर्ण करावे लागणार आहे. कोर्स पूर्ण झाल्यावर एक प्रश्नपत्रिका येते, त्यातील उत्तरे सोडवून ती सबमिट केल्यावर लगेचच निकाल येतो. त्यानंतर संबंधित शिक्षकास प्रशिक्षण पूर्ण केल्याचे ऑनलाइन प्रमाणपत्र मिळते.

## उद्योगांची भरारी, स्थानिकांच्या हातात बेरोजगारी!

विकासाचा लाभ स्थानिकांना मिळायलाच हवा, अशी भूमिका घारे यांनी मांडली. स्थानिकांच्या जमिनीवर उद्योग उभे राहत असतील, तर स्थानिक तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. संबंधित व्यवस्थापनांनी हा प्रश्न गांभीर्याने सोडवला नाही, तर त्यांना जाब विचारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. रायगडच्या औद्योगिक विकासाचे मूल्यमापन करताना केवळ गुंतवणूक, उत्पादन आणि उद्योगांची संख्या न पाहता या उद्योगांमधून स्थानिकांना किती रोजगार मिळाला? हा प्रश्नही विचारला गेला पाहिजे. उद्योगांच्या विस्तारासोबत स्थानिकांच्या रोजगाराच्या अपेक्षाही पूर्ण होणार का, याकडे आता रायगडमधील तरुणांचे लक्ष लागले आहे.

## पालीतील आढावा बैठकीत तक्रारींचा पाऊस

समितीच्या कै नामदेवशेट खैरे सभागृहात संपन्न झालेल्या या बैठकीस माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर जैन, पंचायत समिती सभापती जागृती मानकर, उपसभापती संदेश शेवाळे, गटविकास अधिकारी लता मोहिते, रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार उत्तम कुंभार, पाली नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर, नगरसेवक, विविध विभागांचे अधिकारी तसेच तालुक्यातील ग्रामस्थ उपस्थित होते.खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार होती. मात्र, काही अपरिहार्य कारणामुळे ते प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत. त्याबद्दल आमदार अनिकेत तटकरे यांनी बैठकीच्या सुरुवातीलाच दिलगिरी व्यक्त केली. बैठकीत सर्वाधिक चर्चेचा विषय जलजीवन मिशनचा ठरला. संबंधित अधिकाऱ्यांनी तालुक्यातील २९ गावांमधील जलजीवन मिशनच्या योजना पूर्ण झाल्याचे सांगत संबंधित गावांची नावे वाचून दाखविली. मात्र, उपस्थित ग्रामस्थांनी यावर तीव्र आक्षेप घेत अनेक योजना प्रत्यक्षात अपूर्ण असल्याचा आरोप केला.गावांमध्ये पाण्याच्या टाक्या उभारलेल्या नाहीत, टाक्यांपर्यंत अथवा घरांपर्यंत टाकण्यात आलेल्या पाईपलाईन फुटलेल्या आहेत, तर अनेक ठिकाणी अद्याप एक थेंबही जलजीवन मिशनचे पाणी घरापर्यंत पोहोचलेले नाही, अशी वस्तुस्थिती ग्रामस्थांनी मांडली. योजनांची कामे पूर्ण झाल्याचे अधिकारी सांगत असताना प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळी असल्याने बैठकीत काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.यावर आमदार अनिकेत तटकरे यांनी २९ गावांची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे निर्देश दिले. पंचायत समिती सभापती, उपसभापती आणि संबंधित अधिकाऱ्यांनी या गावांना भेट देऊन वस्तुस्थितीचा अहवाल सादर करावा. तसेच पुढील सोमवारी अधिकारी आणि ग्रामस्थांची पुन्हा बैठक घेऊन या प्रश्नावर निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## चार कोटींचा गाळ कुणाच्या घशात?

या प्रकल्पात तलावातील गाळ काढणे, त्याची वाहतूक करून योग्य ठिकाणी साठवणूक करणे तसेच तलावाच्या इतर कामांचा समावेश आहे. मात्र प्रत्यक्षात गाळ काढण्याचे काम अपेक्षेप्रमाणे झाले नसल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. यापूर्वीही शार्लोट लेकमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याचे आणि गाळमुक्तीचे काम रखडल्याचे वृत्त समोर आले आहे. २०२६ मध्येही तलावातील गाळ न काढताच बिले अदा केल्याच्या आरोपावरून हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. निविदेतील अटींनुसार मोठ्या प्रमाणात गाळ काढून त्याची वाहतूक करण्याची जबाबदारी ठेकेदारावर होती. मात्र काम अपुरे असतानाही मोठ्या प्रमाणात बिल अदा करण्यात आल्याचा आरोप होत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काम अपुरे, बिल मात्र जवळपास पूर्ण मग जबाबदार कोण? असा सवाल माथेरानकर विचारत आहेत. शार्लोट लेक हा माथेरानच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा जलस्रोत आहे. तलावात गाळ साचल्यामुळे त्याची पाणी साठवण क्षमता कमी होत असल्याचे यापूर्वीही निदर्शनास आले आहे. २०२६ मध्ये माथेरानमध्ये पाणीटंचाईच्या प्रश्नावरही नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त झाली होती. दरम्यान, तलावातील पाणी सोडण्याच्या निर्णयामुळे गाळ वाहून जाण्याची शक्यता आणि त्याचा गाळमुक्तीच्या कामावर होणारा परिणाम याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यामुळे तलावाची प्रत्यक्ष पाहणी करून आतापर्यंत काढलेल्या गाळाचे प्रमाण, केलेली वाहतूक, अदा केलेली रक्कम आणि निविदेतील अटींची पूर्तता यांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

## जुन्या पंचायत समितीची इमारत बनली धोकादायक

याच परिसरातील स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मारकालाही पाण्याने वेढले आहे. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशीही या स्मारक परिसरात पाणी साचलेले असताना ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मारकाची अशी अवस्था असणे ही प्रशासनासाठी गंभीर बाब असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. या परिसरातील इतर शासकीय इमारतींची अवस्थाही चिंताजनक आहे. सर्व शिक्षा अभियानाची इमारत गळकी आणि धोकादायक झाली असून, वापराविना पडून असलेल्या इमारतींची देखभाल होत नसल्याने त्या हळूहळू भूतबंगल्याचे स्वरूप धारण करीत आहेत. शासनाच्या निधीतून उभारलेल्या या इमारतींचा योग्य वापर न झाल्याने लाखो-कोट्यवधी रुपयांची सार्वजनिक मालमत्ता अक्षरशः वाया जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.कार्यालय परिसरात अनधिकृतपणे उभी केली जाणारी वाहने, वाढलेली झाडे-झुडपे आणि अस्वच्छतेमुळे संपूर्ण परिसराचा बकालपणा वाढला आहे. उघड्यावरच मुतारीचा वापर होत असल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेत आणखी भर पडत आहे. शासकीय कार्यालयांच्या परिसराची अशी अवस्था असताना स्वच्छता आणि सुरक्षिततेचे नियम नेमके कोणासाठी, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. एका बाजूला नवीन आणि प्रशस्त शासकीय इमारती उभारल्या जात असताना दुसऱ्या बाजूला जुन्या इमारतींची देखभाल न झाल्याने त्या पडझडीच्या अवस्थेत जात आहेत. त्यामुळे शासनाचा मोठा निधी खर्च करून उभारलेल्या मालमत्तेचा प्रभावी वापर होत नसल्याचे चित्र आहे.नियोजनाचा अभाव आणि संबंधित यंत्रणांच्या उदासीनतेमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा आहे. पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता कार्यालय आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे कार्यालय नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाशी संबंधित महत्त्वाची कार्यालये आहेत. त्यामुळे कर्मचारी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून ही कार्यालये तातडीने सुरक्षित, सुसज्ज आणि नवीन इमारतीत स्थलांतरित करावीत, अशी जोरदार मागणी होत आहे. तसेच जुन्या पंचायत समिती परिसरातील पाण्याचा कायमस्वरूपी निचरा, स्वच्छता, धोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट, अनधिकृत वाहनांवर कारवाई आणि परिसरातील झाडे-झुडपे हटवून स्वच्छता करण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे.

## चिमुकलीवर अत्याचार करून हत्या

शोधाशोध सुरु केली तेव्हा हा नराधम गावात सर्वांदेखत फिरत पोलिसांना दिलेला गुंगारा देत राहिला. मात्र, दरम्यानच्या काळात काही गोष्टी समोर आल्याने या नराधमाचे बिंग फुटले. या नराधमाने चिमुकलीच्या घरापासून दीड किलोमीटर अंतरावर सायकल उभी केली आणि पुढं तो घनदाट शेतीकडे गेला. हे ऊसाचं क्षेत्र आहे, इथं बाजूला नाला आहे. इथूनचं चिमुरडीला घेऊन तो पुढं गेला. ऊसाच्या क्षेत्रात १०० मीटर आत आला आणि नेमकं हे दुष्कृत्य त्याने कुठं केलं याचा शोध घेण्यात आला. घनदाट शेत, बाजूला ओढा, शेत मालकही आठवड्यातून याठिकाणी एकदा फिरकतात, या सर्वांचा त्याला अंदाज असावा. त्यामुळेच या निर्मनुष्य स्थळी तो चिमुरडीला घेऊन आला आणि त्याने तिच्यावर अत्याचार करुन तिला मारुन टाकले.यानंतर पोलीस दुपारी साडेचारच्या सुमारास १६ ते १७ कर्मचारी पिंपळवंडीला आले. त्यांनी गावात सगळीकडे शोधाशोध केली. त्यानंतर साडेपाच- पावणेसहाच्या सुमारास पोलिसांनी सीसीटीव्ही चेक करायला घेतले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर या नराधमाचे बिंग फुटले. सीसीटीव्हीचं चित्रीकरण तपासलं जात असताना पोलिसांना पहिला क्लू मिळाला.गावात एका माणसाच्या घरी सीसीटीव्ही आहेत. पोलिसांनी तिकडे सीसीटीव्ही फुटेज तपासायला सुरुवात केली. कुठल्याही प्रकारचा गुन्हा केल्याचे भाव त्याच्या चेहऱ्यावर जाणवत नव्हते. हरवलेल्या चिमुरडीचा शोध पोलीस आणि ग्रामस्थ घेत होते, तेव्हा हा नराधम त्यांच्यासोबतच होता आणि तो तपासात दिशाभूल करण्याचा प्रयत्न करायचा. त्याच्या चेहऱ्यावर कोणताही पश्चाताप नव्हता. पुढं हाचं आरोपी निघाल्यावर सर्वांना धक्का बसला.सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे हा नराधम जमलेल्या त्या सर्व लोकांमध्ये बसून होता. हा नराधम सर्वांसोबत स्टूलवर बसलेला होता. तो सीसीटीव्ही

फुटेजमध्ये सायकलवरुन जाताना कॅमेऱ्यात दिसला. तेव्हा हा नराधम स्वत:च बोलला, मी सायकलवरुन चाललोय. त्यानंतर अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे वळून पाहिजे. तेव्हा पोलिसांना पहिला क्लू मिळाला. त्यानंतर आणखी दुसऱ्या व्यक्तीच्या घरी पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासले. तिथेदेखील कॅमेऱ्यात एक सायकल आली आणि पटकन डावीकडे वळालेली दिसली. पण ती कॅमेऱ्यापासून दूर असल्यामुळे त्या व्यक्तीची ओळख पटली नाही. मात्र, पोलीस अधिकाऱ्यांनी ही गोष्ट हेरली. त्यांना सायकलवरील व्यक्ती म्हणजे मगाशी बोलणारा व्यक्ती असल्याचे लक्षात आले. मग पोलिसांनी या नराधमाला गाडीत टाकले आणि गावात फिरवले. तो कुठे-कुठे फिरला याबद्दल विचारणा केली. त्यावेळी या नराधमाने मळ्यात गेल्याचे सांगितले. तेव्हा गावातील एका व्यक्तीने तो जर मळ्यात गेला तर परत येताना कॅमेऱ्यात दिसेल, असे म्हटले. मात्र, हा नराधम सायकलने मळ्यात गेलाच नव्हता. त्यामुळे तो मळ्यात जाताना दिसून आला नाही. त्यानंतर पोलिसांनी या नराधमाला ताब्यात घेऊन चौकशी सुरु केली. पोलिसी हिसका दाखवताच त्याने मुलीवर अत्याचार केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलीस त्याला घेऊन गावात आले. पोलिसांसोबत तो घटनास्थळी गेला. तेव्हा त्याने गुऱ्हाळाच्या शेजारून खाली गेल्यावर असणाऱ्या तागाच्या शेतीजवळील पाईपच्या खाली मुलीला टाकल्याचे दिसून आले.

## आता प्रत्येक सर्पदंशाची नोंद होणार

एएसव्ही उपलब्ध करून देणे महत्त्वाचे ठरते. मात्र, सर्पदंशाच्या अनेक घटनांची आरोग्य यंत्रणेकडे नोंद होत नसल्याने त्याबाबतची अचूक माहिती उपलब्ध होण्यात अडचणी येतात. ही बाब लक्षात घेऊन सर्पदंशाच्या घटनांची शास्त्रशुद्ध नोंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सर्पदंश प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी राज्यस्तरावर संचालक यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यावर ही जबाबदारी राहणार आहे. महापालिका क्षेत्रात वैद्यकीय अधिकारी तसेच अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. सर्पदंशाची प्रत्येक संशयित, संभाव्य किंवा निश्चित घटना संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा जिल्हा शल्यचिकित्सकांना कळवावी लागणार आहे. सर्पदंशामुळे मृत्यू झाल्यास त्याची माहिती उपलब्ध संवाद यंत्रणेद्वारे तत्काळ देणे बंधनकारक करण्यात आले आहे. ही माहिती आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली, एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम किंवा शासनाने निश्चित केलेल्या अन्य अहवाल प्रणालीमध्ये नोंदवली जाणार आहे.सर्पदंश झालेल्या रुग्णाच्या नोंदीमध्ये दंशाची तारीख आणि ठिकाण, रुग्णाचे वय व लिंग, सर्पदंशाची परिस्थिती, विषबाधेची लक्षणे, करण्यात आलेले उपचार आणि देण्यात आलेल्या एएसव्हीच्या कुप्यांची संख्या यांचा समावेश करावा लागणार आहे. रुग्णाला अन्य रुग्णालयात संदर्भित केले असल्यास त्याचा तपशील, उपचाराचा परिणाम आणि मृत्यू झाल्यास त्याची स्वतंत्र नोंद ठेवणेही बंधनकारक असेल. या माहितीच्या आधारे सर्पदंशाचे प्रमाण, त्याचे भौगोलिक स्वरूप, उपचारांची गरज आणि एएसव्हीच्या उपलब्धतेचे नियोजन करणे आरोग्य विभागाला शक्य होणार आहे. त्यामुळे सर्पदंशाच्या घटना केवळ उपचारापुरत्या न राहता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठीही या नोंदींचा उपयोग होणार आहे.

## सावत्र पित्याच्या क्रौर्याने उरण हादरले

मोक्ष हा सावत्र मुलगा असल्याने त्याला किरकोळ कारणांवरून मारहाण करून मानसिक व शारीरिक त्रास दिला जात असल्याचे तपासात समोर आले आहे.१४ ऑगस्ट रोजी घरात मोक्ष आणि जितेंद्र दोघेच असताना मोक्षने तू माझा खरा पप्पा नाहीस, मला माझ्या खऱ्या पप्पांकडे जायचंय असा हट्ट धरला. या बोलण्याचा जितेंद्रला संताप आला. त्याने मोक्षचे डोके भिंतीवर आपटले, लाकडी काठीने त्याच्या पायांवर मारहाण केली आणि त्यानंतर सोफ्यावर पाडून छातीवर जोरदार ठोसा मारला. या अमानुष मारहाणीत डोक्याला गंभीर दुखापत होऊन तसेच बरगड्या फ्रॅक्चर झाल्याने मोक्षचा मृत्यू झाला.

## रंजित दळवीला जामीन मंजूर

अर्ज दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, मयुर वनगे यांनी आरोपी रंजित दळवीच्या जामिनाला उच्च न्यायालयात आव्हान देण्याचा निर्णय घेतल्यास या प्रकरणातील पुढील कायदेशीर लढाई अधिक महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे अन्य आरोपींच्या जामीन अर्जांकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.या प्रकरणातील आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नसल्याने तपास यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. २० दिवस उलटूनही आरोपी पोलिसांच्या हाती लागत नसतील, तर यामागे नेमके कारण काय? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.पेण पोलिसांनी यापूर्वी अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये जलद तपास करत आरोपींना काही तासांतच ताब्यात घेतले आहे. नुकत्याच घडलेल्या एका चिमुकलीच्या हत्या प्रकरणातही पोलिसांनी अवघ्या काही तासांत आरोपीला पकडले होते. मग मयुर वनगे मारहाण प्रकरणात २० दिवस उलटूनही आरोपी पोलिसांच्या हाती का लागत नाहीत, हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.हा केवळ तपासातील विलंब आहे की या प्रकरणामागे राजकीय दबाव आहे? अशी चर्चा पेणमध्ये सुरू झाली आहे. मात्र, राजकीय दबाव असल्याचा कोणताही ठोस पुरावा अद्याप समोर आलेला नसून, या चर्चेला पोलिसांच्या तपासातूनच उत्तर मिळणे अपेक्षित आहे.आता आरोपींच्या अटकेसह तपासाची दिशा, आरोपी क्रमांक ४ च्या जामिनाविरोधातील उच्च न्यायालयीन लढाई आणि उर्वरित आरोपींच्या संभाव्य जामीन अर्जांवर पुढे काय निर्णय होतो, याकडे पेणकरांचे लक्ष लागले आहे.

## 'शिवसेना पक्ष आणि चिन्ह गोठवा'

लक्ष लागले आहे. कपिल सिब्बल यांनी यापूर्वीही आपले मुद्दे प्रभावीपणे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर मांडले असून विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष वेगवेगळा असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला होता. त्यामुळे, शिवसेना पक्ष आणि चिन्ह आपल्यालाच मिळेल, असा विश्वास शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी अनेकदा व्यक्त केला आहे. तर, एकतर शिवसेना पक्ष आणि चिन्ह आपल्याला मिळेल किंवा ते गोठवलं जाईल, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. आता, ठाकरेंचे वकिल कपिल सिब्बल यांनी मोठी मागणी करत चिन्ह आणि पक्षाचे नाव गोठवण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. कपिल सिब्बल यांच्याकडून सुनावणीत अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. सर्वप्रथम त्यांनी विधीमंडळ पक्षात आणि राजकीय पक्षात काय फरक असतो, हे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच पुढे युक्तिवाद मांडताना शिवसेना पक्ष हा एकनाथ शिंदे यांचा होऊच शकत नाही. तो पक्ष उद्धव ठाकरे यांचा आहे, असाही दावा केला. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाले परंतु ते कोणत्या पक्षातून झाले हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आमदारांनी बंडखोरी केली. सुनील प्रभू यांनी बोलावलेल्या बैठकीला शिंदे यांचे आमदार गैरहजर होते. देवेंद्र फडणवीस यांनीच राज्यपालांना बहुमत चाचणी घेण्यास सांगितले. त्यानंतर विधीमंडळ पक्षाने एकनाथ शिंदे यांना मुख्य नेता म्हणून निवडलं. निवडीचं पत्र राज्यपालांना देण्यात आलं, असा सगळा घटनाक्रमही सिब्बल यांनी न्यायालयापुढे मांडला.

## पांडवकड्याने घेतला आठवड्यात दुसरा बळी!

प्रवाह सुरू असल्याचे दिसून आले.अग्निशामक दलाच्या जवानांनी जीव धोक्यात घालून पाण्यात उतरून तरुणाचा शोध सुरू केला. शोधमोहीमेदरम्यान एका दगडाच्या कपारीत सुमारे दहा ते बारा फूट खोलीवर तरुण मृतावस्थेत आढळून आला. जवानांनी त्याला पाण्याबाहेर काढून स्ट्रेचरच्या सहाय्याने डोंगराच्या खाली आणले. त्यानंतर रुग्णवाहिकेतून त्याला रुग्णालयात पाठविण्यात आले.मृत तरुणाचे नाव प्रणव मिश्रा (१६, रा. कुर्ला) असे आहे. घटनास्थळी खारघर पोलीसही उपस्थित होते.दरम्यान, १३ ऑगस्ट रोजी याच पांडवकडा परिसरात २३ वर्षीय आदित्य विश्वकर्मा याचा बुडून मृत्यू झाला होता. एका आठवड्याच्या आत दुसऱ्या तरुणाचा बळी गेल्याने या परिसरात सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.पावसाळ्यात पांडवकडा धबधब्यावर पाण्याचा प्रवाह वाढत असल्याने परिसर अत्यंत धोकादायक बनतो. अशा परिस्थितीत नागरिक आणि पर्यटकांनी धोकादायक ठिकाणी प्रवेश करू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### जाहीर नोटीस

दि. १९/०८/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल वैभव रामचंद्र पाटील यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक समिर नंदकुमार सुर्वे व संगिता संजय सालावकर यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| दळवी खरोशी ता.अलिबाग | ८५ | क्षेत्र ०-४३-२०<br>पो.ख ०-०५-१०<br>एकुण क्षेत्र ०-४८-३० | ९.६७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी समिर नंदकुमार सुर्वे व संगिता संजय सालावकर यांच्या हिश्याचे एकुण क्षेत्र ०-२४-०० हे. आर, आकार ५.३७ रू.पै इतक्या क्षेत्राची मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. (पळी आंबेघर), पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं.९२७३२७३८४३/९६३७२७००१९

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसी ने कळवण्यात येते की, आमच्या अशिल श्रीमती उर्मिला दाराब तल्यारखान राहणार आवास पो. आवास तालुका अलिबाग जिल्हा रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून खाली सही करणार यांचे मार्फत खालील जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

आमच्या अशिल श्रीमती उर्मिला दाराव तल्यारखान यांनी त्यांचा सख्खा भाऊ श्री. अनिल सदानंद डेव्हीड यांना खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत नोंदणीकृत अखत्यारपत्र क्रमांक १५७१/२०२४ दिनांक २८ मार्च २०२४ रोजी दिलेले होते.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्र. उप विभाग | क्षेत्र (हे आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| ७२/१० | ००-४०-०० | ६.६८ |
| ७३ | ००-४६-२५ | १.९१ |

सदर अखत्यारपत्र हे आमचे अशिल आता रद्द करीत आहेत, यापुढे सदर अखत्यारपत्राचा वापर श्री अनिल सदानंद डेव्हीड यांनी करणे चा नाही किंवा सदरहू अखत्यारपत्र हे रद्द केले असल्याने याचा वापर करून केलेला कोणताही व्यवहार आमचे अशील यांचेवर बंधनकारक राहणार नाही व रद्द होण्यास पात्र असेल.

याबाबत स्वतंत्र वकिलांमार्फत नोटीस आमचे अशील यांनी वकिलांमार्फत श्री अनिल सदानंद डेव्हीड यांना पाठवलेली आहे.

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत वर वर्णन केलेल्या अखत्यारपत्राचा वापर करून कोणत्याही इसम वा संस्था यांनी कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास, सदर व्यवहार आमचे आशील यांच्यावर बंधनकारक राहणार नाही व त्या त्यांना कायद्याचा सल्ला प्राप्त होईल त्याप्रमाणे सदरहू व्यवहार रद्द करून मागतील व त्याचे होणारे सर्व परिणाम खर्च यांची जोखीम जबाबदारी ही संबंधित इसम वा संस्था यांच्यावर राहील याची गंभीर समज सर्वांनी घ्यावी,
कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक १८/०८/२०२६

सही/-
**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

### मुरूड जंजिरा नगरपरिषद

**मुरूड जंजिरा नगरपरिषद पथ विक्रेता निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरुड, जि. रायगड**

पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१६ मधील नियम १४( २ ) अंतर्गत ८ पथविक्रेत्यांच्या सदस्यांची निवडणूक सन २०२६-२७ चे निवडणूक कार्यक्रमाबाबत

**जाहीर प्रकटन**

| अ.क्र. | विवरण | दिनांक व दिवस | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्राचे वाटप करणे | २४/०८/२०२६ सोमवार<br>२५/०८/२०२६ मंगळवार | स. ११.०० ते दु. ३.०० | मुरुड जंजिरा नगरपरिषद सभागृह |
| २ | नामनिर्देशन पत्र स्विकारणे | ३१/०८/२०२६ सोमवार | स. ११.०० ते दु. ३.०० | |
| ३ | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे. | ०२/०९/२०२६ बुधवार | स. ११.०० वाजले पासून | |
| ४ | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिद्ध करणे. | ०२/०९/२०२६ बुधवार | छाननी नंतर | |
| ५ | आक्षेप अर्ज स्विकारणे, | ०३/०९/२०२६ गुरूवार | स. ११.०० ते दु. ३.०० | |
| ६ | वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे. | ०३/०९/२०२६ गुरूवार | दु. ३.०० नंतर | |
| ७ | नामनिर्देशनपत्र मागे घेणे | ०४/०९/२०२६ शुक्रवार | सायं. ५.०० वाजेपर्यंत | |
| ८ | माघारी नंतरची अंतिम यादी प्रसिद्ध करणे. | ०४/०९/२०२६ शुक्रवार | सायं. ५.०० नंतर | |
| ९ | मतदान घेणे | ०९/०९/२०२६ बुधवार | स.७.३० ते सायं.५.०० | |
| १० | मतमोजणी | ०९/०९/२०२६ बुधवार | सायं. ६.०० वाजले पासून संपेपर्यंत | |
| ११ | निवडणूक निकाल जाहीर करणे | ०९/०९/२०२६ बुधवार | मतमोजणं संपल्या नंतर तात्काळ | |

**टिप :** निवडणूक कार्यक्रमा विषयी आवश्यक त्या सुचना/माहिती नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचेवेळी उपलब्ध होतील.

सही/-
**(राखी गावडे)**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मुरूड तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद पथविक्रेता प्रतिनिधी निवडणूक**

## निवडक




### सरकत्या जिन्यांचे काम रखडले

**नेरळ** : येथील रेल्वे स्थानकातील फलाट दोनवर मुंबईच्या दिशेकडे सरकता जिना उभारण्याचे काम सुरु आहे. या सरकत्या जिन्याचे काम गेल्या दोन महिन्यांपासून बंद स्थितीत आहे. प्रवासी वर्गाची गैरसोय लक्षात घेऊन मुंबई रेल कॉर्पोरेशनकडून सरकता जिना उभारण्याचे काम जोमाने करावे, अशी मागणी स्थानकातून दररोज प्रवास करणारे प्रवाशी संतोष पेडामकर यांनी केली आहे. नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात फलाट दोनवर नवीन सरकता जिना बनविला जात आहे. त्या ठिकाणी पूर्वी अस्तित्त्वात असलेला पादचारी पूल मध्य रेल्वेकडून तोडून टाकण्यात आला आहे. त्यानंतर त्या ठिकाणी सरकता जिना बनविला जाणार आहे. हा पादचारी पूल तोडण्यात आल्यानंतर साधारण वर्षभर त्या ठिकाणी कोणतेही काम करण्यात आले नाही. त्यामुळे तेथे नवीन पूल बनविला जाणार नव्हता तर जुना पादचारी पूल का तोडण्यात आला? असा प्रश्न सर्वसामान्य प्रवासी विचारत आहेत. मात्र, मध्य रेल्वे प्रशासनाकडून त्यावर कोणतेही उत्तर दिले गेले नाही. आता नवीन सरकता जिना बनवण्याचे काम मुंबई रेल कोर्पोरेशन कडून सुरु करण्यात आले आहे. मात्र, त्या ठिकाणी खड्डा खोदून ठेवला असून, त्यापुढे कोणतेही काम रेल्वे कडून करण्यात आलेले नाही.

### खराब रस्त्यामुळे हालिवली ग्रामस्थ त्रस्त

**नेरळ** : कर्जत शहराला लागून असलेल्या हालिवली गावामध्ये स्थानिकांची वाट खड्डेमय रस्त्याने सुरु होत असून, पुढे अस्ताव्यस्त पडलेला कचरा हि मोठी समस्या बनली आहे. तसेच, ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारच्या सुविधा मिळत नसल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.



हालीवली परिसरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि ठिकठिकाणी साचलेल्या कचऱ्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. परिसरातील काही रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून, पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचत आहे. त्यामुळे वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच, हालीवली परिसरातील काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, कागद, घरगुती कचरा व इतर घनकचरा उघड्यावर टाकण्यात आलेला दिसून येत आहे. कचऱ्याचे ढीग वाढत असल्याने दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. पावसाच्या पाण्यासोबत कचरा परिसरात पसरत असल्याने परिस्थिती आणखी गंभीर होत आहे. या समस्येकडे संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्त्यांची दुरुस्ती, खड्ड्यांची डागडुजी, नियमित कचरा संकलन आणि कचरा टाकण्यास प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.



### वेळास येथे लोकसहभागाची क्रांती

**वेळास** : ग्रामीण भागातील शाळांचा कायापालट करण्यासाठी लोकसहभाग किती महत्त्वाचा ठरू शकतो, याचे उत्तम उदाहरण श्रीवर्धन तालुक्यातील वेळास येथील आदर्श मराठी शाळेत पाहायला मिळाला आहे. या शाळेचा परिसर स्वच्छ, सुंदर आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक सुरक्षित व्हावा या उदात्त उद्देशाने लोकसहभागातून तब्बल १ लाख ५० हजार रुपये खर्चाचे पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे. दरवर्षी पावसाळ्यात शाळेच्या प्रांगणात चिखल व पाण्याचे साम्राज्य निर्माण होत असल्याने लहानग्या विद्यार्थ्यांना, तसेच शिक्षकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही गंभीर समस्या ओळखून शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य धवल तवसाळकर यांनी पुढाकार घेतला आणि आपल्या मित्रपरिवाराच्या सहकार्याने हे काम प्रत्यक्ष मार्गी लावले. या सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात वेळासचे माजी उपसरपंच सुरेश धोपट, तेजस दळवी आणि श्रिया शैलेश कासेकर यांनी आर्थिक व प्रत्यक्ष सहकार्य दिले. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शाळा परिसराचे रूपच बदलून गेले असून शाळेच्या सौंदर्यात मोठी भर पडली आहे.

# आश्रमशाळेत निकृष्ट दर्जाचा भाजीपाला

**| नेरळ | प्रतिनिधी |**

- **आदिवासी ठाकूर समाज संघटनेचा आरोप**
- **शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात**

कर्जत तालुक्यात चार शासकीय आदिवासी आश्रमशाळा आहेत. या चार शासकीय आश्रमशाळांमध्ये भाजीपाला पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराकडून नित्कृष्ट दर्जाचा आणि खराब भाजीपाल्याचा पुरवठा होत आहे. याबाबत कर्जत तालुका आदिवासी ठाकूर संघटना आक्रमक झाली असून, नित्कृष्ट भाजीपाल्याचा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

कर्जत तालुका हा आदिवासी बहुल तालुका म्हणून संपूर्ण राज्यात ओळखला जातो. या तालुक्यात चार शासकीय आश्रम शाळा आहेत. चाफेवाडी, पिंगळस, भालिवडी, पाथरज या आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आहाराच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भाजीपाल्याच्या दर्जाबाबत आणि पुरवठ्याच्या वेळेबाबत कर्जत तालुका आदिवासी ठाकूर समाज संघटनेच्या कार्यकर्त्यांनी चिंता वाटत आहे. त्यामुळे आदिवासी आश्रमशाळेत राहून निवासी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आहाराबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने कर्जत तालुका आदिवासी ठाकूर समाज संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून आश्रम शाळांना रात्रीची अचानक भेटी दिल्या आहेत. या भेटीत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भाजीपाल्याची पाहणी केली असता अनेक धक्कादायक बाबी समोर आल्याचा दावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी



केला आहे.

या आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या आहारासाठी वापरण्यात येणारा भाजीपाला दररोज ताजा असणे आवश्यक आहे. शासनाच्या नियमांनुसार विद्यार्थ्यांना पौष्टिक आणि ताजा आहार देणे बंधनकारक असतानाही प्रत्यक्षात चार ते पाच दिवसांनी भाजीपाल्याचा पुरवठा केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. आठवड्यात दर गुरुवारी शाळांमध्ये भाजीपाल्याचा पुरवठा करण्यात आला होता. त्यानंतर पुढील पुरवठा सोमवारी करण्यात आल्याने जवळपास चार दिवस नवीन भाजीपाला उपलब्ध झाला नसल्याचे समोर आले आहे. तसेच, संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पाहणी केलेल्या भाजीपाल्याचा दर्जा समाधानकारक नसल्याचे दिसून आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न निर्माण झाले आहेत. याबाबत शासकीय आदिवासी आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांकडून योग्य प्रकारे देखरेख केली जात नाही, असे दिसून आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आहाराबाबत संबंधित अधिकारी आणि प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

**सखोल चौकशी करण्याची मागणी**

आश्रम शाळांमध्ये भाजीपाला वाहतूक करणारी गाडी पहाटेच्या सुमारास शाळांमध्ये पोहोचणे अपेक्षित असताना ती रात्री साडेआठच्या सुमारास शाळांमध्ये पोहोचत असल्याचेही समोर आले आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि ताजा आहार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी कर्जत तालुक आदिवासी ठाकूर समाज संघटनेने प्रशासनाकडे केली आहे. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांनी आश्रम शाळांमधील आहार व्यवस्थेची तातडीने तपासणी करावी, अशी मागणी केली आहे.

> “आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना सायंकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास रात्रीचे जेवण दिले जाते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता दिला जातो. मात्र, भाजीपाला रात्री उशिरा पोहोचत असल्याने त्याचा विद्यार्थ्यांच्या आहार व्यवस्थेवर परिणाम होत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
> – नितीन निरगुडा, सचिव, आदिवासी ठाकूर संघटना, कर्जत”

काही दिवसांपूर्वी गडचिरोली जिल्ह्यातील एका आश्रम शाळेत अन्नातून विषबाधा झाल्याची घटना घडली होती. त्या घटनेत अनेक विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातही अशीच परिस्थिती निर्माण होणार का, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

## जयंत पाटील यांच्याकडून अमोल पाटील यांची सांत्वनपर भेट



**| वाघ्रण | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील नारंगी ग्रामपंचायतीचे सदस्य आणि शेकापचे कार्यकर्ते अमोल पाटील यांचे वडील सुधीर पाटील (७०) यांचे गुरूवारी (दि.१३) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी चारुता, मुलगे अमोल व हर्षल, स्नुशा व नातवंडे असा परिवार आहे. सुधीर पाटील यांचे दिवसकार्य मंगळवारी (दि.२५) भुवनेश्वर येथे होणार आहेत. दरम्यान, शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी मंगळवारी (दि.१८) अमोल पाटील यांच्यासह कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी सुप्रिया पाटील, कमळाकर वाघमोडे, अनिल पाटील, रुपेश पाटील, अनिल पाटील, अनिल धुमाळ व ग्रामस्थ उपस्थित होते.

## १२ लाखांचे दागिने लंपास

**| पनवेल | प्रतिनिधी |**

सुकापूर येथील एका इमारतीत घराची खिडकी उघडी असल्याचा फायदा घेत चोरट्यांनी खिडकीजवळ ठेवलेल्या पर्समधून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा तब्बल १२ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना मध्यरात्री घडली. याप्रकरणी वृद्ध महिलेने खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, पनवेल शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घराच्या खिडक्या व दरवाजे बंद ठेवण्याबरोबरच मौल्यवान वस्तू सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## समुद्रकिनारा रस्त्याच्या कामाला सुरुवात

**| नागाव | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील पर्यटनदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या नागाव-बदामी समुद्रकिनारा परिसरातील रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाला अखेर मुहूर्त लागला आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले हे काम आता प्रत्यक्षात सुरू करण्यात आले आहे. ग्रामस्थांची गरज लक्षात घेऊन नागाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून हे काम हाती घेण्यात आले असून, बुधवार दि.१९ ऑगस्टपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. या कामाचा शुभारंभ नागावच्या सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य



प्रियांका काठे, शांभवी म्हात्रे, परेश ठाकूर, वीणा पिंपळे यांच्यासह पद्माकर गुरव, मनोहर ठाकूर, राजेंद्र ठाकूर, अरुण गुरव, अनिल मानकर, अक्षय मानकर, अभिषेक नाईक, शुभम गुरव आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

नागाव येथील बदामी समुद्रकिनाऱ्याकडे जाणाऱ्या सुमारे २५० ते ३०० मीटर लांबीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामासाठी पंधराव्या वित्त आयोगातून १.५० लाख रुपये, तर ग्रामपंचायत स्वनिधीतून ५ लाख रुपये, असा एकूण ६.५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. हा बदामी समुद्रकिनाऱ्याकडे जाणारा महत्त्वाचा रस्ता असून, काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर स्थानिक ग्रामस्थांसह पर्यटकांचीही मोठी सोय होणार आहे. तसेच, या रस्त्याची वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होण्यासही मदत होणार आहे. या कामासाठी सरपंच हर्षदा मयेकर यांनी सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक निधीची उपलब्धता व कामाची कार्यवाही पूर्ण करून घेतली.

## अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली नशामुक्तीची शपथ

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

‘नशामुक्त भारत अभियान’ हे केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत दि.१५ ऑगस्ट २०२० रोजी सुरू करण्यात आलेले महत्त्वाचे राष्ट्रीय अभियान आहे. यंदा या अभियानाचे सहावे वर्ष साजरे होत असून, मंगळवारी (दि.१८) रायगड जिल्हा परिषदेत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नशामुक्तीची शपथ घेतली.

गेल्या काही वर्षांत तरुणांमध्ये अमली पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे तरुणांच्या वैयक्तिक आयुष्य व आरोग्यासह



कुटुंबाचे आरोग्यही धोक्यात येत आहे. त्याचप्रमाणे याचा समाजावरदेखील दूरगामी परिणाम होत आहे. आजची तरुणाई ही देशाचे भवितव्य आहेत. त्यामुळे तरुणांना सर्व प्रकारच्या नशांपासून दूर करणे, दुष्परिणाम रोखणे आणि समाज व्यसनमुक्त करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या अभियानांतर्गत रायगड जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्यावतीने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळी राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जालिंदर पठारे, समाजकल्याण विभाग अधिकारी सुनिता मते, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) सुनिल भोपळे, यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नोकरीच्या बहाण्याने लाखोंची फसवणूक

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

करंजाडे येथे राहणारे ग्रामसेवक परमेश्वर जाधव यांच्या मुलीला सरकारी बँकेत नोकरी लावून देतो असे सांगून छत्तरसिंग सुखलाल राजपूत (५५) आणि अनिल कचरे यांनी २०२३ पासून जाधव यांच्याकडून ३१ लाख १७ हजार रुपये घेतले. यावेळी त्यांच्या मुलीला बँक ऑफ बडोद्याच्या शाखेत कामावर पाठवण्यात आले. मात्र, तिला शासनाकडून पगार येत नव्हता. खासगी पगार येत असल्याने त्याची विचारणा जाधव यांनी राजपूत यांच्याकडे केली. तसेच, तिला बँक ऑफ बडोदाचे बनावट अपॉइंटमेंट लेटर देखील देण्यात आले होते. याबाबत परमेश्वर जाधव यांनी राजपूत यांच्याकडे शासकीय नोकरी लावण्यासाठी घेतलेल्या पैशांची विचारणा केली. यावेळी राजपूत यांनी टाळाटाळ केली. फसवणूक झाल्याचे जाधव यांच्या लक्षात आल्याने त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पनवेल शहर पोलीसांनी सत्तरसिंग राजपूत याला वसई येथून ताब्यात घेऊन अटक केली.

## पोलिसांच्या सतर्कतेमुळे दुर्घटना टळली

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

मुंब्रा-पनवेल महामार्गावरील तळोजा आरएएफ सर्कल येथील सिग्नलवर प्रवाशांनी भरलेली एनएमटी बस उभी असताना चालकाला अचानक रक्ताची उलटी झाली. त्यानंतर चालक स्टेअरिंगवरच बेशुद्ध पडल्याने काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. मात्र, सिग्नलवर तैनात असलेल्या तळोजा वाहतूक विभागाच्या पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली. रघुनाथ काटे असे चालकाचे नाव असून, ही बस तळोजा फेज-१ येथून खारघर रेल्वे स्थानकाकडे जात होती. सिग्नलवर बस उभी असतानाच चालकाची प्रकृती अचानक बिघडली. ही बाब लक्षात येताच पोलीस हवालदार राजेश गाढवे यांनी तातडीने बसजवळ धाव घेतली. त्यांनी चालकाला प्राथमिक उपचारासह सीपीआर देत बसमधून खाली उतरवले. यावेळी पोलीस शिपाई सोपान आव्हाड यांनीही मदत केली. चालकाची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी वेळ न दवडता त्याला रिक्षातून जवळच्या दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. त्यामुळे चालकाला वेळीच वैद्यकीय मदत मिळाली. दरम्यान, चालक सिग्नलवर बस उभी असतानाच बेशुद्ध पडल्याने बस अनियंत्रित होऊन इतर वाहनांना धडकण्याची शक्यता होती. बसमध्ये मोठ्या संख्येने प्रवासी असल्याने परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकली असती.

## प्रसाद पाटील यांच्या कार्याची दखल

**| पेण | प्रतिनिधी |**

जिते परिसरातील नागरिकांसाठी दि.६ जुलैची पहाट अक्षरशः काळरात्र ठरली. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानंतर अचानक ढगफुटीसदृश पावसाने परिसराला झोडपून काढले. गावातील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. अशा भीषण परिस्थितीत प्रसंगावधान राखत रेल्वेचा संभाव्य मोठा अपघात टाळणारे प्रसाद पाटील यांच्या कार्याची दखल घेत रेल्वे प्रशासनाने दि. १५ ऑगस्ट रोजी त्यांचा विशेष सत्कार केला.

प्रसाद पाटील यांना दि.६ जुलै रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास त्यांच्या मित्राच्या घरात पाणी शिरल्याचा फोन आला. परिस्थिती पाहण्यासाठी ते तातडीने



मित्रासोबत बाहेर पडले. मात्र, खरोशी फाटा ते चुनाभट्टीदरम्यान राष्ट्रीय महामार्गावर सुमारे चार ते पाच फूट पाणी साचल्याने पुढे जाणे शक्य झाले नाही. त्यानंतर गावातील परिस्थितीचा आढावा घेत असताना त्यांचे लक्ष रेल्वे मार्गाकडे गेले. रेल्वे रुळाजवळ जाऊन पाहिले असता पावसाच्या पाण्यामुळे रुळाखालील माती व खडी मोठ्या प्रमाणात वाहून गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तब्बल २० मीटरपर्यंत रेल्वे रुळ हवेत लटकलेल्या अवस्थेत असल्याचे दिसून आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून क्षणाचाही विलंब न करता त्यांनी मित्रासह जिते रेल्वे स्थानक गाठले. स्टेशन प्रशासनाला प्रत्यक्ष माहिती देतानाच त्यांनी घटनास्थळाचा व्हिडिओही दाखवला.प्रसाद पाटील यांनी दिलेल्या या माहितीची तातडीने दखल घेत रेल्वे प्रशासनाने पुढील कार्यवाही केली आणि त्या मार्गावरून येणाऱ्या गाड्यांना धोका होऊ नये यासाठी आवश्यक खबरदारी घेतली. विशेष म्हणजे, काही दिवसांनी त्यांना रेल्वे प्रशासनाकडून माहिती मिळाली की, घटना घडलेल्या ठिकाणाहून अवघ्या अर्ध्या तासाने वंदे भारत एक्स्प्रेस जाणार होती. त्यामुळे प्रसाद पाटील यांच्या प्रसंगावधानामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याचे स्पष्ट झाले.

**अलिबागमधून प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ | जिल्ह्यात एकूण ७२ प्रशिक्षण सत्रांचे आयोजन**

## सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा अभियान

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने ‘सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा अभियान’ राज्यभर राबवविण्यात येत आहे. या अंतर्गत रायगड जिल्ह्यात एकूण ७२ प्रशिक्षण सत्र घेण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग तालुक्यातून करण्यात आला. यावेळी अलिबागमध्ये सात प्रशिक्षण सत्रे घेण्यात आली.



आयुष्मान आरोग्य मंदिर, उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आणि आशा कार्यकत्र्यांच्या माध्यमातून ही सेवा थेट ग्रामस्थांपर्यंत पोहोचवली जाते. गावात माता व बालमृत्यू दर शून्य ठेवणे, टी.बी., उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कर्करोग यांचे वेळेत स्क्रिनिंग करणे आणि गृहभेटी, आरोग्य सत्रे आयोजित करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत अलिबागमध्ये ७ सत्रे घेण्यात आली. त्यानंतर उरण तालुक्यात ४ सत्रे होणार आहेत. तसेच, पेण ५, म्हसळा २, महाड ६, मुरूड ३, खालापूर ४, कर्जत ८, रोहा ६, सुधागड ३, श्रीवर्धन २, माणगाव ६, पोलादपूर २, पनवेल ९, तळा २ अशी एकूण ७२ प्रशिक्षण सत्रे घेण्यात येणार आहे. ही प्रशिक्षण सत्रे राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी, माता बाल संगोपन अधिकारी डॉ.दामोदर मोरे, जिल्हा प्रशिक्षण केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ. मिलिंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार आहेत.

**१३ मूलभूत घटकांवर मार्गदर्शन**

१. गरोदरपण, प्रसूती व प्रसूतीपश्चात काळजी, २. नवजात व अर्भक आरोग्य सेवा, ३. बालक व किशोरवयीन आरोग्य, ४. कुटुंब नियोजन व प्रजनन आरोग्य, ५. संसर्गजन्य आजारांचे व्यवस्थापन, ६. सामान्य व किरकोळ आजारांवर उपचार, ७. असंसर्गजन्य आजारांचे नियंत्रण, ८. डोळे व कान यांचे प्राथमिक आरोग्य, ९. दातांची स्वच्छता, मुखाच्या कर्करोगाची तपासणी आणि तंबाखूमुक्तीसाठी जनजागृती, १०. वृद्धापकाळ व पॅलिएटिव्ह केअर, ११. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, १२. मानसिक आरोग्य सेवा, १३. योग व आयुष पद्धती.

## ६०० ग्रॅम गांजा जप्त

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवीन पनवेल शहरातील श्रेयस हॉस्पिटललगतच्या झोपडपट्टीत गांजाची विक्री करणाऱ्या दोन तरुणांना नवी मुंबई अंमली पदार्थविरोधी पथकाने सापळा रचून अटक केली. पोलिसांनी संबंधित ठिकाणाहून सुमारे ६०० ग्रॅम गांजा जप्त केला असून, या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांना श्रेयस हॉस्पिटललगतच्या झोपडपट्टीतून गांजाची विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार अंमली पदार्थविरोधी पथकाने परिसरावर लक्ष ठेवून कारवाईची तयारी केली. मंगळवारी सापळा रचून गांजाची विक्री करणाऱ्या दोन तरुणांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर झोपडपट्टीतील एका घराची झडती घेतली असता तेथे सुमारे ६०० ग्रॅम गांजा आढळून आला. हा गांजा विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. जप्त केलेल्या गांजाची किंमत लाखो रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दोन्ही आरोपींविरोधात संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, गांजाच्या विक्रीच्या या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही पोलीस तपास करीत आहेत.

## अल्फा पिढीचा उद्रेक

दिल्लीत जंतरमंतरवर आंदोलनाला उतरले त्यांना जेन झी म्हटले गेले. जेन झी म्हणजे जनरेशन झी. १९९७ ते २०११ या दरम्यान जन्माला आलेली पिढी म्हणजे जेन झी. थोडक्यात ज्यांचे वय आज १५ ते ३० च्या दरम्यान आहे ती तरुण वयातील मुले. त्यानंतर म्हणजे २०१० ते २०२४ च्या दरम्यान आलेली पिढी म्हणजे अल्फा. म्हणजे दहा ते सोळा वर्षांपर्यंतची मुले. दिल्लीतील आंदोलनाने आता या अल्फा पिढीलाही प्रेरणा मिळाली आहे. देशात अनेक ठिकाणी शाळकरी मुलांनी निषेध किंवा प्रत्यक्ष आंदोलन केल्याच्या बातम्या येत आहेत. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कोंदिवडे गावच्या मुलींचा व्हिडिओ बराच व्हायरल झाला. हातातली छत्री म्हणजे जणू टेलिव्हिजनचा माईक असे समजून या मुली चिडून बोलताना दिसत आहेत. रस्त्याची सोय नसल्याने व इतर गैरसोयींमुळे रोज आपले चार-पाच तास वाया जातात, शिक्षणाकडे नीट लक्ष देता येत नाही अशी तक्रार या मुलींनी केली. हा व्हिडिओ इतका व्हायरल झाला की राज ठाकरे यांनी त्या मुलींना बोलावून घेतले. त्यामुळे त्याची अधिकच प्रसिध्दी झाली. त्यावेळी टीव्हीवाल्यांनी या मुलींच्या मुलाखती घेतल्या. तेव्हा या मुलींच्या इच्छा-आकांक्षा शहरात नोकरी व्यवसाय करण्याच्या आहेत हे दिसून आले. त्यापैकी एका मुलीला स्टेनो व्हायचे होते, तर दुसरीला स्केच आर्टिस्ट. एकीला यूट्यूबवर काहीतरी करायचे होते. पण हे सर्व करण्यासाठी मुळात आपल्याला चांगले शिकले पाहिजे हे त्यांना कळले आहे. शहरातील मुलांना कशा सुखसोयी मिळतात हे त्या टीव्हीवर पाहतात. त्याच टीव्हीवर त्या बातम्याही पाहतात. जंतरमंतरवर जे चालू होते ते आपल्याशी संबंधित होते हे त्यांना कळले. आपल्या परिसरातील प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी असेच काही करायला हवे हेही त्यांना जाणवले. आपण शाळकरी आहोत, आवाज उठवला तर काय होईल याची भीती त्यांना वाटत नाही. म्हणूनच त्यांनी हा व्हिडियो केला. त्या निर्भयपणे पुढे येऊन बोलू लागल्या.

### विषमतेची जाणीव

याच धर्तीवर विदर्भातल्या अकोले जिल्ह्यातील मुलामुलींचा व्हिडिओ समोर आला. तेही आपला शाळेत जाण्याचा रस्ता किती खराब आहे हे दाखवत होते. याच धर्तीवर बीड, धाराशिव इथेही आंदोलने झाली. बीडमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेवर बहिष्कार घातला. कारण, तिथले शिक्शक सदैव गैरहजर असतात. धाराशिवमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद कार्यकारी अधिकाऱ्याच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरु केले. डहाणूमध्ये तीस जुलै रोजी एका खेड्यातील शाळेतील पन्नास विद्यार्थ्यांनी तहसिलदारांच्या कार्यालयासमोर निदर्शने केले. तुटलेली बाके, स्वच्छतागृहे नाहीत, वर्गखोल्या खराब या गैरसोयींविरुध्द हा निषेध होता. विशेष म्हणजे यात मुलींचा पुढाकार मोठा होता. या धरणे आंदोलनामुळे अखेर चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला. हे सर्व गरीब घरातले, सरकारी शाळांमध्ये शिकणारे व गावखेड्यात राहणारे विद्यार्थी आहेत. मध्यम वर्गातले, प्रचंड फी भरणारे व बाहेरून चकचकीत दिसणाऱ्या शाळांमध्ये शिकणारे नव्हेत. रस्ते, शाळा यांच्या अडचणींबद्दलचा त्यांचा उद्रेक हा मनापासून आलेला आहे. आपल्या आणि शहरी, श्रीमंत मुलांमधील दरी त्यांना जाणवत आहे. अल्फा जनरेशनचे वैशिष्ट्य असे की ही पिढी मोबाईल, इंटरनेट आणि आता एआयचा वापर करीत वाढलेली आहे. आज खेड्यापाड्यातही मोबाईल व टीव्ही पोचला आहे. त्यामुळे जगात किती प्रकारची सुबत्ता व संधी आहेत हे ही मुले रोजच्या रोज पाहतात. पूर्वी आपल्या बापजाद्यांनी केले तसेच कष्ट शेतीत किंवा इतरत्र करणे भाग आहे असे आधीच्या पिढ्यांना वाटत असे. पण ही नवी पिढी त्या मानसिक चक्रातून व गुलामगरीतून बाहेर आली आहे. त्यांना नव्या जगात वावरण्याची स्वप्ने खुणावत आहेत. त्यासाठी आवाज कसा उठवायला हवा हे त्यांना जंतरमंतरवरील आंदोलकांनी दाखवून दिले आहे. त्याचाच कित्ता गावोगावी ही मुले गिरवत आहेत. या गावोगावच्या मुलांमध्ये संताप होताच. पण जंतरमंतरने त्यांच्यात ठिणगी टाकली. तिचा भडका उडाला. इतर असंख्य गावांमध्येही शाळा, इस्पितळे यांची अशीच दुरवस्था आहे. तेथील मुले काही कारणांमुळे रस्त्यावर येत नसतील. पण त्यांच्यातही असंतोषाची हीच भावना आहे हे ध्यानात ठेवायला हवे.

### दाबलेल्या आवाजांचा स्फोट

महाराष्ट्राप्रमाणेच उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा अशा एरवी मागास समजल्या जाणाऱ्या राज्यांमध्येही मुलांनी आवाज उठवल्याच्या बातम्या आहेत. उत्तर प्रदेशात फतेहपूर जिल्ह्यात किशनपूर शहरातील सर्वोदय इंटर स्कूलमधील सहावी ते बारावी वर्गातले तब्बल पंधराशे विद्यार्थी रस्त्यावर उतरले व त्यांनी सहा तास धरणे आंदोलन केले. वर्गात वीज नाही, असली तरी पंखे धड चालत नाहीत, घाणेरडी शौचालये, अस्वच्छ पाणी आणि खराब माध्यान्ह भोजन अशा याविरुध्द त्यांच्या तक्रारी होत्या. या आंदोलनाचा परिणाम म्हणून जिल्ह्याच्या शाळा खात्याच्या अधिकाऱ्यांनी येऊन पाहणी केली व सर्व अडचणी दूर करण्याचे आश्वासन दिले. पिलिभित, लखनौ, बिहारमध्ये गया इत्यादी ठिकाणीही अशीच आंदोलने झाली. राजस्थानमध्ये बारमेरमध्ये शाळा सुरू होऊन दोन महिने झाले तरी शिक्षक नाहीत या स्थितीविरुध्द शाळेला विद्यार्थ्यांनी कुलुप लावले. जालोरमध्येही असेच आंदोलन झाले. मध्य प्रदेशातील आश्रमशाळांमध्ये अशी आंदोलने झाली. सुदूर ईशान्येत तसेच जम्मू काश्मीरमध्येही काही ठिकाणी मुलांनी आंदोलने केल्याच्या बातम्या आहेत. गंमत म्हणजे पंधरा ऑगस्टला नरेंद्र मोदी भाजप सरकारने या देशात जणू क्रांती केली असे भाषण करत असतानाच ही आंदोलने गावखेड्यात अजून शाळांमध्ये धड शिक्षकही नाहीत ही अवस्था चव्हाट्यावर आणत होती. नीट पेपरफुटीचे आंदोलन हे काही मूठभर मध्यमवर्गीयांचे आहे असे भासवण्याचा प्रयत्न झाला. पण सर्व शिक्षण व्यवस्थेचा बोजवारा उडाला असून त्यात असंतोष खदखदतो आहे हे या आंदोलनांनी आंदोलन सुरू केले आहे. त्यात काल हिंगोलीच्या एका दारुड्या मुख्याध्यापकाची हकालपट्टी करण्यात आली. गावोगावच्या अशा कहाण्या आता समोर येणार आहेत. आयटी, एआय, महाशक्ती, विश्वगुरुच्या बाता मारणाऱ्या भारताच्या पायाखाली काय जळते आहे याचे दर्शन घडवणारे हे प्रकार आहेत. काँग्रेसच्या काळात वृत्तपत्रे व इतर मिडिया याविषयी कायम बोलत असे. मोदींच्या राजवटीत हा मिडिया भाजपने विकत घेतला. मोदींची गुलामी करू लागला. सर्व काही उत्तम चालले आहे असे गुणगान सुरु झाले. विरोधी पार्टींनी याविषयी आवाज उठवला तर त्यांना प्रसिद्धी द्यायची नाही असे धोरण ठरवण्यात आले. यामुळे जनतेचा आवाज दाबला गेला. आता याच दाबलेल्या आवाजांचा देशभर स्फोट होत आहे. हा स्फोट अजूनही लहान प्रमाणात आहे. पण तो कोणत्याही मिनिटाला मोठा होऊ शकतो. भाजपवाले अजूनही असा विरोध आपण गुंडाळू शकतो अशा मस्तीत आहेत. त्यांना जमिनीवर आणण्याचे सामर्थ्य या आवाजांमध्ये आहे.

## विचार

# मेगा शिपबिल्डिंग क्लस्टर काय साधणार?

**कोकणातील किनाऱ्यावर उभे राहणारे दिघीतील जहाजबांधणी केंद्र भविष्यात केवळ जहाजेच तयार करणार नाही, तर रोजगार, औद्योगिक समृद्धी, निर्यातवाढ आणि आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नालाही नवे बळ देईल. त्यामुळे या प्रकल्पाकडे केवळ पायाभूत सुविधांचा विस्तार म्हणून न पाहता, महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासातील एक निर्णायक वळण म्हणून पाहण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन घेतलेला एका लक्षवेधी प्रकल्पाचा मागोवा.**



प्रा. सुखदेव बखळे

भारताने २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे ध्येय निश्चित केले आहे. या प्रवासात उत्पादन क्षेत्र, पायाभूत सुविधा, संरक्षण उद्योग, निर्यात आणि सागरी अर्थव्यवस्था यांना विशेष महत्त्व दिले जात आहे. अशा वेळी शासनाने घेतलेला महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील दिघी येथे सुमारे वीस हजार कोटी रुपयांचा 'ग्रीनफिल्ड शिपबिल्डिंग क्लस्टर' उभारण्याचा निर्णय हा केवळ आणखी एक औद्योगिक प्रकल्प नाही, तर भारताच्या सागरी सामर्थ्याला नवी दिशा देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. एके काळी व्यापार, नौकानयन आणि समुद्री दळणवळणासाठी प्रसिद्ध असलेल्या महाराष्ट्राच्या किनारपट्टीला पुन्हा जागतिक औद्योगिक नकाशावर स्थान मिळवून देण्याची क्षमता या प्रकल्पामध्ये आहे. भारतात जवळपास साडेसात हजार किलोमीटरची किनारपट्टी आहे. त्यापैकी महाराष्ट्राचा सुमारे सातशे वीस किलोमीटरचा समुद्रकिनारा हा देशातील आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक महत्त्वाच्या किनारपट्ट्यांपैकी एक मानला जातो. मुंबई, जवाहरलाल नेहरू बंदर, दिघी, रेवदंडा, दाभोळ, जयगड यासारखी बंदरे राज्याच्या सागरी अर्थव्यवस्थेचा कणा आहेत; मात्र एवढी मोठी किनारपट्टी असूनही जहाजबांधणी उद्योगात भारताचे स्थान आजही अपेक्षेइतके मजबूत नाही. चीन, दक्षिण कोरिया आणि जपान या देशांनी जहाजबांधणीच्या माध्यमातून जागतिक व्यापारात वर्चस्व निर्माण केले, तर भारताकडे नैसर्गिक साधनसंपत्ती आणि भौगोलिक लाभ असूनही या क्षेत्राचा पुरेसा विकास झाला नाही. त्यामुळे दिघीतील प्रस्तावित 'मेगा शिपबिल्डिंग क्लस्टर' हा अनेक दशकांपासून असलेली उणीव भरून काढण्याचा प्रयत्न मानावा लागेल.

आज जगातील सुमारे नव्वद टक्के आंतरराष्ट्रीय व्यापार समुद्रमार्गे होतो. त्यामुळे जहाजांची मागणी सातत्याने वाढत आहे. मालवाहू जहाजे, कंटेनर वाहतूक, एलएनजी जहाजे, संरक्षण क्षेत्रातील युद्धनौका, ऑफशोअर ऊर्जा प्रकल्पांसाठी लागणारी विशेष जहाजे आणि दुरुस्ती उद्योग या सर्व क्षेत्रांमध्ये मोठी बाजारपेठ निर्माण झाली आहे. भारताने या क्षेत्रात स्वतःची मजबूत उपस्थिती निर्माण केल्यास त्याचा थेट फायदा देशाच्या निर्यातीला, रोजगाराला आणि औद्योगिक विकासाला होणार आहे. दिघीची निवडदेखील अत्यंत विचारपूर्वक करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील हे ठिकाण खोल पाण्याच्या किनाऱ्यामुळे, विद्यमान बंदर सुविधांमुळे आणि मुंबई तसेच जवाहरलाल नेहरू बंदराशी असलेल्या सुलभ संपर्कामुळे उद्योगासाठी अनुकूल मानले जाते. दक्षिणेला असलेले दिघी बंदर आणि भविष्यात विकसित होणाऱ्या सागरी पायाभूत सुविधांमुळे या परिसरात जागतिक दर्जाचे जहाजबांधणी केंद्र विकसित होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र सरकार आणि मुंबई पोर्ट प्राधिकरणाने संयुक्त विशेष उद्देश संस्था स्थापन करून या प्रकल्पाची पायाभरणी सुरू केली आहे. केंद्र सरकारच्या जहाजबांधणी विकास योजनेअंतर्गत या क्लस्टरला मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत मिळणार असल्याने अंमलबजावणीला गती मिळण्याची अपेक्षा आहे. येथे केवळ जहाजबांधणीच होणार नाही, तर संपूर्ण औद्योगिक परिसंस्था विकसित केली जाणार आहे. जहाजांचे इंजिन तयार करणारे उद्योग, स्टील फॅब्रिकेशन, जहाजांसाठी आवश्यक यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक प्रणाली, विशेष उपकरणे, रंगनिर्मिती, केबल्स, प्रोपेलर, समुद्री सुरक्षा साहित्य आणि दुरुस्ती सेवा अशा अनेक पूरक उद्योगांना येथे स्थान मिळेल.

जगभरातील यशस्वी 'शिपबिल्डिंग क्लस्टर'ची ताकद अशाच पूरक उद्योगांच्या साखळीत असते. त्यामुळे एका मोठ्या जहाजबांधणी प्रकल्प उभारणीपेक्षा हा संपूर्ण औद्योगिक शहर उभारण्याचा प्रयत्न आहे. या प्रकल्पासाठी देशातील सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य अशा 'माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड' या जहाजबांधणी कंपनीला अँकर शिपयार्ड म्हणून सहभागी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. संरक्षणक्षेत्रातील युद्धनौका, पाणबुड्या आणि अत्याधुनिक जहाजबांधणीचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या या संस्थेच्या सहभागामुळे प्रकल्पाला तांत्रिक विश्वासार्हता मिळू शकते. त्याचबरोबर खासगी गुंतवणूकदारांनाही या प्रकल्पाकडे आकर्षित करण्यास मदत होईल. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राच्या सहभागातून उभा राहणारा हा प्रकल्प भारताच्या औद्योगिक विकासाच्या नव्या मॉडेलचे उदाहरण ठरू शकतो. रोजगाराच्या दृष्टीने पाहिले असता या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित होते. जहाजबांधणी हा अत्यंत श्रमप्रधान उद्योग आहे. अभियंते, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, डिझाइन तज्ज्ञ, मरीन इंजिनीअर, मशीन ऑपरेटर, लॉजिस्टिक व्यवस्थापक, गुणवत्ता नियंत्रण तज्ज्ञ, संशोधक आणि हजारो कुशल-अकुशल कामगार यांना या उद्योगातून मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळू शकतो. त्याशिवाय वाहतूक, हॉटेल, निवास, शिक्षण, आरोग्य, प्रशिक्षण संस्था आणि लघुउद्योगांनाही मोठी चालना मिळेल. रायगड आणि कोकणातील तरुणांना रोजगारासाठी मुंबई किंवा परदेश गाठण्याची गरज कमी होऊ शकते; मात्र एवढ्या मोठ्या प्रकल्पासोबत काही गंभीर प्रश्नही उपस्थित होतात.

कोकणाचा समुद्रकिनारा हा पर्यावरणीयदृष्ट्या अतिशय संवेदनशील प्रदेश आहे. येथे मॅन्ग्रोव्ह, खाड्या, मासेमारी, जैवविविधता आणि किनारी परिसंस्था यांचे संरक्षण अत्यावश्यक आहे. मोठ्या प्रमाणावर जमीन संपादन, भराव, ड्रेजिंग आणि औद्योगिक विकासामुळे पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विकास आणि पर्यावरणातील संतुलन राखणे ही या प्रकल्पाची सर्वात मोठी कसोटी असेल. पर्यावरणीय मंजुरी ही केवळ औपचारिक प्रक्रिया न राहता वैज्ञानिक मूल्यांकनावर आधारित असावी. स्थानिक नागरिक, मच्छीमार आणि पर्यावरण तज्ज्ञ यांचा विश्वास संपादन करणेही तितकेच महत्त्वाचे ठरेल. कोकणातील अनेक मोठ्या प्रकल्पांना स्थानिकांचा विरोध झाल्याची उदाहरणे महाराष्ट्राने यापूर्वी पाहिली आहेत. त्यामुळे या प्रकल्पात पारदर्शकता, योग्य पुनर्वसन, स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य आणि सामाजिक विकासाची हमी या बाबींची काटेकोर अंमलबजावणी करावी लागेल. उद्योग उभा राहताना स्थानिक समाजाचा सहभाग आणि विश्वास टिकवणे हेच प्रकल्पाच्या दीर्घकालीन यशाचे गमक ठरेल. भारताला जहाजबांधणी क्षेत्रात मोठी झेप घ्यायची असेल, तर केवळ बंदरे उभारून चालणार नाही. संशोधन, तंत्रज्ञान, कौशल्य विकास आणि जागतिक दर्जाचे उत्पादन यांनाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल. हरित इंधनावर चालणारी जहाजे, स्वयंचलित तंत्रज्ञान, डिजिटल डिझाइन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कार्बन उत्सर्जन कमी करणारी जहाजे ही भविष्यातील गरज आहे.

दिघीतील 'शिपिंग क्लस्टर' या नव्या तंत्रज्ञानाचे केंद्र बनले, तर भारताला जागतिक स्पर्धेत वेगळी ओळख निर्माण करता येईल. याचबरोबर हा प्रकल्प भारताच्या संरक्षण क्षेत्रासाठीही महत्त्वाचा आहे. हिंद महासागर परिसरातील वाढती भूराजकीय स्पर्धा, सागरी सुरक्षा आणि नौदलाची वाढती गरज लक्षात घेता देशांतर्गत जहाजबांधणी क्षमता वाढवणे ही राष्ट्रीय सुरक्षेची गरज बनली आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करून स्वदेशी उत्पादनाला चालना देण्याच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेलाही या प्रकल्पामुळे बळ मिळेल. केंद्र सरकारने २०३७ पर्यंत भारताची जहाजबांधणी क्षमता तब्बल चाळीसपट वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे लक्ष्य महत्त्वाकांक्षी असले, तरी अशा मोठ्या क्लस्टरच्या माध्यमातून ते साध्य करण्याचा मार्ग नक्कीच खुला होऊ शकतो; मात्र यासाठी प्रकल्प वेळेत पूर्ण होणे, प्रशासकीय निर्णय जलद घेतले जाणे, आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होणे आणि गुंतवणूकदारांचा विश्वास टिकवणे अत्यंत आवश्यक आहे. भारतातील अनेक मोठे प्रकल्प विलंब, मंजुरीतील अडथळे आणि खर्चवाढीमुळे रखडल्याची उदाहरणे आहेत. दिघीच्या 'शिपिंग क्लस्टर' प्रकल्पाबाबत अशी पुनरावृत्ती होऊ नये, हीच अपेक्षा. दिघीतील 'मेगा शिपबिल्डिंग क्लस्टर' हा केवळ रायगड किंवा महाराष्ट्राचा प्रकल्प नाही, तर भारताच्या सागरी भवितव्याशी जोडलेला राष्ट्रीय महत्त्वाचा उपक्रम आहे. योग्य नियोजन, पर्यावरणीय जबाबदारी, तांत्रिक उत्कृष्टता आणि पारदर्शक अंमलबजावणी यांचा समतोल साधता आला, तर हा प्रकल्प महाराष्ट्राला सागरी उद्योगाचे जागतिक केंद्र बनवू शकतो.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

## चर्चा आजची

# 'महाराष्ट्राला बिहार करू नका'



संतोष राऊळ

महाराष्ट्रात अनेक सणांची मुळे रोवली गेली आहेत. येथे प्रत्येक सण पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. याआधी अनेक परकिय आक्रमणं महाराष्ट्र राज्यावर झाली. पण येथील सण आणि परंपरा अद्याप टिकून राहिलेल्या आहेत. मात्र, आताचे वातावरण पाहता या सणांना स्पर्धेचे आणि मनोरंजनाचे रूपडे देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे चित्र समोर येत आहे. नुकताच नागपंचमी हा सण राज्यात साजरा झाला. त्यावेळी ३२ शिराळा येथील झालेला प्रकार सोशल मिडीयावर प्रचंड व्हायरल होत आहे. त्यामुळे बिहार राज्याची परंपरा महाराष्ट्र राज्यात वाढत असल्याचे वेळोवेळी समोर येत आहे. त्यामुळे ''महाराष्ट्राला बिहार करू नका'', असे कट्टर महाराष्ट्रप्रेमींकडून बोलले जात आहे.

भारत हा असा एकमेव देश आहे जिथे हिंदू धर्मासह वेगवेगळ्या धर्माचे सण, उत्सव साजरे केले जातात. जो तो ज्याच्या त्याच्या पारंपारिक पद्धतीने तो उत्सव साजरा करत असतो. परंतु, आताचे वातावरण पाहता या उत्सवांना स्पर्धेचे आणि मनोरंजनाचे रूप दिले जात असल्याचे निदर्शनास येत आहे. नुकताच नागपंचमी सण साजरा झाला. मात्र, यावेळी नागाची पुजा होण्याऐवजी भलत्याच दर्शनाला तरूणाई गेल्याचे निदर्शनास आले. यादिवशी ३२ शिराळा येथे असाच प्रकार पाहायला मिळाला, जो अजूनही सोशल मिडीयावर प्रचंड व्हायरल होत आहे.

खरंतर ३२ शिराळ्याला शिवाजी महाराज्यांच्या आधीपासूनची एक परंपरा आहे. सुमारे १२०० वर्षांपूर्वीपासून येथे नागपंचमीच्या दिवशी जिवंत नागाला पुजायची परंपरा आहे. त्याची सुरूवात गोरक्षकांनी केली होती. नाथांनी नागाची भीती लोकांमधून निघून जावी यासाठी ही प्रथा चालू केल्याचे बोलले जाते. येथील नागपंचमीची तयारी एक महिना अगोदर पासूनच सुरू होते. ग्रामस्थ नाग मंडळे स्थापन करून जिवंत नाग पकडण्यासाठी जायचे. त्या नागाची उत्सव संपेपर्यंत योग्यप्रकारे काळजी घतील जायची. परंपरेनुसार नागपंचमीच्या दिवशी गावातील ग्रामदेवतेची पुजा करून साधारणपणे १०० ते १२५ नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जात असे. त्यानंतर नागाचे खेळ आयोजित केले जात. या खेळामध्ये उंच फणा काढणारा नाग आणि सर्वात लांब नाग पकडलेल्या मंडळाला बक्षिसे दिली जात. परंतु, यादरम्यान नागांचे प्रचंड हाल व्हायचे. त्यामुळे वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार सापांना पकडणे, त्यांचा खेळ करणे तसेच मिरवणूक काढणे, प्रदर्शन करणे आणि त्यांच्या स्पर्धा भरविण्यास बंदी करण्यात आली आहे. त्यामुळे जिवंत सांपांचा खेळ हळूहळू संपुष्टात आला. आणि आता नागाची प्रतिकात्मक मूर्तीची पुजा करून त्यांची मिरवणूक काढली जाते. आजही हा सण ३२ शिराळा येथे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. परंतु, आता या ठिकाणी नागांऐवजी मानवी नागिणींना नाचवले जात असल्याचे निर्दशनास येत आहे.

नुकताच ३२ शिराळा येथे घडलेला प्रकार खुप किळसवाणी असल्याचे बोलले जात आहे. यादिवशी अनेक मनोरंजक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. एखाद्या सणाला काही प्रमाणात स्पर्धा आणि इतर मनोरंजनाचे कार्यक्रम होणे आवश्यक आहे. परंतु, त्याचा अतिरेक होणे केव्हाही वाईटच. ३२ शिराळा येथे तेच झाले. या ठिकाणी डिझेच्या तालावर अश्लिल हावभाव करत नाचगाणे झाले. त्याचे व्हिडीया देखील सोशल मिडीयावर प्रचंड प्रमाणात व्हायरल होत आहेत. त्यावर संताप देखील व्यक्त केला जात आहे. एखाद्या सणाला किंवा कार्यक्रमामध्ये नाचगाणे होणे वाईट गोष्ट नाही. परंतु, ते कोणत्या पद्धतीने होत आहे, हे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. पोटासाठी कोणत्याही थराला जाऊन सणांना आणि परंपरेला अश्लिलतेचा साज दिला जात असेल तर हे महाराष्ट्र राज्यासाठी धोक्याची घंटा आहे. नाचगाणे करा, पण त्याचे सादरिकर पारंपारिक पद्धतीने करा. पारंपारीक गीतं आणि लावणी सादर करा. परंतु, हल्ली लावणीच्या नावाखाली लावणी सोडून खुप काही केलं जातं. त्यामुळे महाराष्ट्रात बिहारी संस्कृती रूजत चालल्याचे बोलले जात आहे.

आता काही दिवसांवर गोपाळकाळा सण येऊन ठेपला आहे. त्यासाठी बाळगोपाळांसह प्रौढांकडून जय्यत तयारी सुरू आहे. या सणालादेखील स्पर्धेचे आणि मनोरंजनाचे रूप देण्यात येत आहे. अलिबाग तालुक्यात देखील एका लोकप्रतिनिधींच्या बॅनरचा व्हिडीयो सोशला मिडीयावर प्रचंड व्हायरल होत आहे. चक्क सराव शिबिरासाठी लाखोंची उधळपट्टी करण्यात येत आहे. जनतेला खास करून तरूणांना आकर्षित करण्यासाठी चक्क एका प्रसिद्ध नृत्यांगनाला बोलविण्यात आले आहे. खरंतर हे सराव शिबीर गोविंदा पथकांसाठी आहे. तिथे नृत्यांगनाचे काया काम? तसेच, जनतेला दहीहंडी सराव शिबर पाहण्यासाठी बोलवत आहात कि नाचगाणे पाहायला, असा प्रश्न येथील सर्वसामान्य जनतेला पडला आहे.

महाराष्ट्राला अनेक वर्षांची परंपरा आहे. अनेक आक्रमणे झाली, अनेक राजे झाले, परिकीय संस्कृती प्रस्थापित झाल्या, तरीदेखील हजारो वर्षांपासून सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्यातील परंपरा कायम असून, आजही सण आणि उत्सव पारंपारिक पद्धतीने साजरे केले जातात. मात्र, आताचे राज्यातील वातारण पाहता महाराष्ट्र राज्यात बिहारची परंपरा रूजु होत असल्याचे निर्दशनास येत आहे. त्यामुळे ''महाराष्ट्राला बिहार करू नका'', असे कट्टर महाराष्ट्रप्रेमींकडून बोलले जात आहे.

## लोकसंसद

### कसोटी क्रिकेटमधील १०० षटकारांचे मानकरी!

एक काळ असा होता की फलंदाजाने षटकार ठोकावा म्हणून स्टेडियममधून 'वि वॉन्ट सिक्सर' च्या घोषणा घुमायच्या. विशेषतः १९७० ते १९८० च्या काळात सलीम दुराणी, संदीप पाटील असे खेळाडू मैदानात उतरले की हमखास अशा घोषणा प्रेक्षकांकडून व्हायच्या. पण आजच्या काळात क्रिकेट इतके बदलले आहे की एकेकाळी मैदानावर ज्या षटकारासाठी हजारो प्रेक्षक आसुसलेले असायचे तो षटकार आता अगदी सामान्य झाला आहे. ज्या पारंपरिक कसोटी क्रिकेट सामन्यात खेळाडूच्या केवळ कौशल्याचीच नव्हे तर त्याच्या संयम, मानसिक ताकद आणि शारीरिक क्षमतेची देखील परीक्षा होते, त्या कसोटी क्रिकेटमध्ये संथ आणि संयमी खेळण्याची परंपरा असली तरी, काही आक्रमक आणि निडर शैलीच्या फलंदाजांनी हा इतिहास बदलला आणि कसोटीतही षटकारांचा पाऊस पाडला. नुकताच श्रीलंकेच्या गॉल येथे श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताच्या ऋषभ पंतने कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद १०० षटकार ठोकण्याचा पराक्रम केला. बेन स्टोक्स (इंग्लंड) १३८ षटकार, ब्रँडन मॅक्क्युलम (न्यूझीलंड) १०७ षटकार आणि ॲडम गिलक्रिस्ट (ऑस्ट्रेलिया) १०० षटकार, यांच्यानंतर कसोटी क्रिकेटमध्ये १०० षटकार पूर्ण करणारा पंत हा एकूण चौथा तर पहिलाच भारतीय फलंदाज ठरला आहे. विशेष म्हणजे भारताच्या रोहित शर्माच्या नावावर कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० सामने मिळून सर्वाधिक षटकार मारण्याचा (एकूण ६६२ षटकार) अद्वितीय जागतिक विक्रम आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी

आज २० ऑगस्ट. भारताचे माजी पंतप्रधान आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे राजीव गांधी यांची जयंती. आधुनिक विचार, विज्ञान-तंत्रज्ञानावरील विश्वास आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे राजीव गांधी यांनी भारताच्या विकासाला नवी दिशा दिली. म्हणूनच त्यांना भारतीय माहिती-तंत्रज्ञान क्रांतीचे प्रमुख शिल्पकार मानले जाते.

२० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वांत तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४०व्या वर्षी त्यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे ज्येष्ठ पुत्र असूनही राजीव गांधी यांना सुरुवातीला राजकारणात विशेष रस नव्हता. त्यांची खरी आवड विज्ञान, तंत्रज्ञान आणि विमानउड्डाणात होती. त्यांनी व्यावसायिक वैमानिक म्हणून इंडियन एअरलाइन्समध्ये काम केले. भाऊ संजय गांधी यांच्या १९८० मधील निधनानंतर राजीव गांधी राजकारणात आले. अमेठी लोकसभा मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढवून विजय मिळवला. १९८२ मध्ये दिल्लीत झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर देशासमोर निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ४०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या आणि राजीव गांधींच्या नेतृत्वाला अभूतपूर्व जनादेश मिळाला. पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे भारताला संगणक, दूरसंचार आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगाकडे नेण्याची त्यांची दूरदृष्टी. ''२१ वे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक असेल'' या विचाराने त्यांनी देशात संगणकीकरण आणि दूरसंचाराच्या विस्ताराला चालना दिली. त्या काळात संगणक आणि आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मोठा विरोध आणि संभ्रम असतानाही त्यांनी भविष्यातील भारताची गरज ओळखली. सॅम पित्रोदा यांच्यासारख्या तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सहकार्याने दूरसंचार क्षेत्राच्या आधुनिकीकरणाला गती मिळाली. राजीव गांधींच्या काळात शिक्षण क्षेत्रालाही नवी दिशा मिळाली. १९८६चे राष्ट्रीय शिक्षण धोरण, जवाहर नवोदय विद्यालयांची संकल्पना, उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर यामुळे शिक्षणव्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडले. पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यासाठी ६४वे आणि ६५ वे घटनादुरुस्ती विधेयक त्यांच्या सरकारने मांडले. ही विधेयके त्या वेळी मंजूर झाली नाहीत; मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक बळ देण्याचा पाया पुढे ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे मजबूत झाला. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या राजकीय सहभागासाठीही नवे दालन खुले झाले. राजीव गांधींच्या कारकिर्दीत काही निर्णयांवर तीव्र मतभेदही झाले आणि त्यांच्या सरकारला अनेक राजकीय आव्हानांना सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना उपलब्धींसोबत मर्यादा आणि वादग्रस्त निर्णयांचाही वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे. २१ मे १९९१ रोजी तमिळनाडूतील श्रीपेरुंबुदूर येथे लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम या श्रीलंकेतील दहशतवादी संघटनेशी संबंधित आत्मघाती हल्ल्यात राजीव गांधी यांची हत्या झाली. त्यांच्या स्मरणार्थ २१ मे हा दिवस भारतात दहशतवादविरोधी दिवस म्हणून पाळला जातो. राजीव गांधी यांनी भारताला तंत्रज्ञानाच्या नव्या युगाची दिशा दाखवली. संगणक आणि दूरसंचार हे केवळ भविष्यातील साधन नसून देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचे आधारस्तंभ ठरू शकतात, हे त्यांनी त्या काळात ओळखले. आज भारत माहिती-तंत्रज्ञान, डिजिटल सेवा आणि दूरसंचार क्षेत्रात जगातील महत्त्वाच्या देशांमध्ये उभा आहे, त्यामागील पायाभरणीत राजीव गांधींच्या धोरणांचा निश्चितच मोठा वाटा आहे. आधुनिक, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या या दूरदृष्टीच्या पंतप्रधानाला त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२० ऑगस्ट

१) श्रीम.हर्षदा यशवंत करंजावकर अलिबाग, दि.२०-८-१९४८

२)श्री.दिपक भास्कर पवार मु.भाजी मार्केट, अलिबाग, दि.२०-८-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**प्रताप गंभीर, स्मरणार्थ अलिबाग**



**स्व प्रकाश हरिश्चंद्र पाटील, स्मरणार्थ अलिबाग**

# आवंडे-तोरणपाडा पूल धोकादायक

- **प्रशासनाचे दुर्लक्ष**
- **मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता**
- **गावांचा संपर्क तुटण्याचा धोका**

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील आवंडे पेढली परिसरातील आवंडे ते तोरणपाडा या गावांना जोडणाऱ्या पूलाची सध्या अत्यंत धोकादायक व जीर्ण अवस्था झाली आहे. अरुंद व ढासळत चाललेल्या या पुलाकडे संबंधित प्रशासन व प्रशासकीय यंत्रणेचे सतत दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप आवंडे येथील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे कार्यकर्ते अशोक देशमुख यांनी केला आहे. प्रशासनाच्या या बेफिकीर कारभारामुळे येथे एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली असून ग्रामस्थांमध्ये प्रचंड संतापाचे व भीतीचे वातावरण पसरले आहे.



या पुलाच्या तातडीच्या मजबुतीकरणासाठी आणि कायमस्वरूपी दुरुस्तीसाठी स्थानिक ग्रामस्थांसह अशोक देशमुख यांनी शासन व प्रशासनाकडे अनेकदा लेखी निवेदन व पाठपुरावा केला आहे. परंतु, वारंवार टाळाटाळ आणि दुर्लक्ष केल्यामुळे पुलाची स्थिती दिवसेंदिवस अधिकच जीर्ण होत चालली आहे. पुलाचे सिमेंट-काँक्रीट उखडले आहे, तर कडा ढासळल्या आहेत. त्यामुळे या पुलावरून प्रवास करणे प्रवाशांसाठी जीवघेणे ठरत आहे.

यंदाच्या जोरदार पावसात या पुलावरून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा प्रवाह वाहत होता. पाण्याचा प्रचंड वेग आणि पुराच्या ताणामुळे हा पूल पूर्णपणे वाहून जाण्याच्या स्थितीत आला होता. भविष्यात किंवा येत्या मुसळधार पावसात जर हा पूल तुटला अथवा वाहून गेला, तर आवंडे, तोरणपाडा तसेच परिसरातील अनेक वाड्या-वस्त्यांचा मुख्य रस्त्याशी असणारा संपर्क पूर्णपणे तुटणार आहे. याचा थेट फटका दररोज प्रवासासाठी या पुलावर अवलंबून असलेल्या शाळकरी विद्यार्थ्यांना, रुग्णवाहिकांना, शेतकऱ्यांच्या मालाच्या वाहतुकीला आणि अत्यावश्यक सेवांना बसणार आहे. एखादी आपत्कालीन वैद्यकीय परिस्थिती निर्माण झाल्यास गावात रुग्णवाहिका पोहोचणेही अशक्य होणार आहे.

> **पुराच्या पाण्यात हा पूल कधीही कोलमडू शकतो. पूल तुटून मोठा अनर्थ घडल्यानंतर प्रशासनाने जागे होऊन अश्रू पुसण्यात काहीही अर्थ नाही. जीवितहानी होण्यापूर्वीच प्रशासनाने तातडीने या समस्येची गंभीर दखल घेऊन निधी उपलब्ध करावा व पुलाच्या दुरुस्तीचे काम तात्काळ सुरू करावे. अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल.**
> **– अशोक देशमुख, शिवसैनिक, उबाठा गट, आवंडे**

## बाजारात रंगीबेरंगी भाज्यांची आवक

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजारपेठेत सध्या विविध प्रकारच्या रंगीबेरंगी भाज्यांची आवक होत असून, त्यामध्ये परदेशी प्रकारच्या भाज्यांनी ग्राहकांचे लक्ष वेधून घेतले आहे. नेहमीच्या भाजीपाल्याबरोबरच लाल, पिवळी आणि हिरवी शिमला मिरची, हिरवे व पिवळे झुकीनी, लाल कोबी यांसारख्या भाज्या बाजारात पाहायला मिळत आहेत.



बाजारातील भाजीच्या स्टॉलवर आकर्षक पद्धतीने मांडलेल्या लाल-पिवळ्या शिमला मिरच्या विशेष लक्षवेधी ठरत आहेत. त्याचबरोबर झुकीनी या परदेशी भाजीचा हिरवा आणि पिवळा प्रकारही विक्रीसाठी उपलब्ध आहे. लाल कोबीचीही आवक दिसून येत आहे. या भाज्यांचा वापर विशेषतः हॉटेल, रेस्टॉरंट आणि विविध खाद्यपदार्थांमध्ये केला जातो. भाज्यांच्या रंग आणि आकारातील वैविध्यामुळे ग्राहकांमध्येही या प्रकारच्या भाज्यांविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. पारंपरिक भाजीपाल्याबरोबर अशा नव्या प्रकारच्या भाज्यांना बाजारात स्थान मिळत असल्याचे चित्र आहे. मात्र, फोटोतील भाज्या पाहता त्यांना 'परदेशातून थेट आयात केलेल्या भाज्या' असे निश्चितपणे म्हणता येत नाही. त्यातील अनेक प्रकार भारतातही मोठ्या प्रमाणावर पिकवले जातात. त्यामुळे 'परदेशी प्रकारच्या किंवा विदेशी नावाने ओळखल्या जाणाऱ्या भाज्या' असा उल्लेख अधिक योग्य ठरतो.



## इकोफ्रेंडली मखरांनी बाजार सजला

**खांदा कॉलनी :** गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने पनवेल शहरातील मूर्तिकारांकडून गणेशमूर्तींना अंतिम रूप देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. तसचे, गणेशमूर्तींच्या सजावटीसाठी आकर्षक आणि पर्यावरणपूरक मखरही पनवेलच्या बाजारपेठेत दाखल झाले असून, गणेशभक्तांकडून त्यांना पसंती मिळत आहे. थर्माकोलच्या वापरावर बंदी असल्याने मखरकारांनी पर्यावरणपूरक पर्याय म्हणून खास फोम आणि विशिष्ट प्रकारच्या लाकडाचा वापर करून विविध आकर्षक मखर तयार केले आहेत. स्वामी समर्थांचे रूप, विविध राजमहालांच्या प्रतिकृती तसेच मखरामधून पाणी वाहत असल्याचा देखावा अशा कल्पक संकल्पनांचा वापर करण्यात आला आहे. घरगुती गणेशोत्सवासाठी कमी जागेत बसणाऱ्या मखरांपासून ते मोठ्या आकाराच्या आकर्षक मखरांपर्यंत विविध प्रकार बाजारात उपलब्ध आहेत.

## अमोल मोहिते यांना पितृशोक

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील बोर्ले गावचे रहिवासी तथा मोर्बा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमोल मोहिते यांचे पिताश्री गणेश सखाराम मोहिते यांचे गुरुवारी (दि.१३) वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ वर्षांचे होते.



त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गणेश मोहिते यांच्या निधनाने मोहिते परिवाराबरोबरच पंचशील मित्रमंडळ बोर्ले व मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांची शोकसभा व जलदान विधी रविवार दि.२३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या राहत्या घरी बोर्ले-मोर्बा येथे होणार आहे.

## बेपत्ता इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

**मुंबई :** नवी मुंबईतील ऐरोली परिसरातील दिघा येथून आठ दिवसांपासून बेपत्ता असलेल्या वसंत शंकर रेवाळे (७१) यांचा रेल्वे अपघातात उपचारादरम्यान मृत्यू झाला. विक्रोळी-घाटकोपर रेल्वे स्थानकांदरम्यान झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाल्यानंतर त्यांना राजावाडी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यांची ओळख पटली नसल्याने ते अनोळखी जखमी म्हणून उपचार घेत होते. तब्बल सात दिवस उपचार घेतल्यानंतर १७ ऑगस्ट रोजी वसंत रेवाळे यांचा मृत्यू झाला. त्यानंतर रबाळे एमआयडीसी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार कुटुंबीयांनी राजावाडी रुग्णालयात धाव घेतली. तेथील मृतदेहाची पाहणी केल्यानंतर तो वसंत रेवाळे यांचाच असल्याची ओळख पटली. या प्रकरणी अपघात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मूळचे रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील देऊळवाडी (आंबवली) येथील रहिवासी असलेले वसंत रेवाळे हे सध्या दिघा, ऐरोली येथील सिद्धिविनायक चाळीत मुलासोबत राहत होते. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी फिरून येतो असे सांगून ते घराबाहेर पडले. मात्र, त्यानंतर ते घरी परतलेच नव्हते.

## चोरढे शाळेत इंग्रजी लॅबचे उद्घाटन

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील वळके केंद्रांतर्गत चोरढे मराठी शाळेत शासनाच्या उपक्रमातून उभारण्यात आलेल्या इंग्रजी लॅबचे उद्घाटन करण्यात आले. पंचायत समिती सदस्या अश्विनी डोंगरीकर यांच्या हस्ते हे उद्घाटन पार पडले. विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचा सराव व्हावा, इंग्रजीची भीती दूर व्हावी आणि त्यांच्यामध्ये तंत्रज्ञानविषयक कौशल्य विकसित व्हावे, या दुहेरी उद्देशाने शासनामार्फत निवडक शाळांमध्ये इंग्रजी लॅब सुरू करण्यात आल्या आहेत. उद्घाटनप्रसंगी



विद्यार्थ्यांनी संगणकाच्या माध्यमातून आत्मसात केलेले ज्ञान तसेच इंग्रजी भाषेतील कौशल्यांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांची प्रगती पाहून अश्विनी डोंगरीकर यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीस या उपक्रमामुळे निश्चितच प्रोत्साहन मिळेल. इंग्रजीची भीती कमी होऊन विद्यार्थी तंत्रज्ञानाकडे अधिक आत्मविश्वासाने वळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे, गायन, नृत्य आणि विविध कलाकृतींमधील उल्लेखनीय प्रगती हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

## वाजेकर महाविद्यालयात रक्षाबंधनाचा उत्सव

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथे प्रजापिता ब्रह्मकुमारी केंद्राद्वारे रक्षाबंधन उत्सव आयोजित करण्यात आला होता.

यावेळी अध्यक्ष पदावरून प्रा. डॉ. आमोद ठक्कर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. भारतीय संस्कृतीतील विविध उत्सव अत्यंत उत्साहाने साजरे केले जातात. त्यात मानवी व सामाजिक मूल्ये समाविष्ट असून हे त्या उत्सवांचे वैशिष्ट्ये आहे. त्यामुळे प्रत्येक उत्सवामध्ये सामाजिक एकात्मता, सलोखा,



बंधुभाव आदी मूल्ये जोपासली जावीत व सामाजिक जाणिवा वाढीस लागाव्यात. त्यासाठी प्रत्येकाने कटिबद्ध राहूया, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी प्रजापिता ब्रम्हकुमारी विद्यालयाच्या दिदी यांनी समाजात सुरू असलेल्या विविध प्रकारचे विकृत वर्तन, होत चाललेला मूल्यांचा ऱ्हास, तसेच विविध व्यसने यापासून दूर ठेवण्यासाठी आध्यात्मिक उत्सव साजरा करणे कसे आवश्यक आहे, हे विशद करत अध्यात्मिक रक्षाबंधन संकल्पना याबद्दल सविस्तर माहिती दिली.

## पांडुरंग वालगुडे यांचे निधन



**पाली :** सुधागड तालुक्यातील राबगाव येथील सेवानिवृत्त शिक्षक पांडुरंग शंकर वालगुडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते. त्यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात शिक्षक म्हणून अनेक विद्यार्थ्यांना ज्ञानदान देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा आप्तपरिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार दि.२४ रोजी, तर उत्तरकार्य गुरुवार दि.२७ ऑगस्ट रोजी राहत्या घरी होणार आहेत.



## गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**रेवदंडा :** पाठारे क्षत्रीय समाज शिक्षण फंड, चौल चंपावती यांच्या माध्यमातून आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२६ उत्साहात पार पडला. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी इयत्ता सातवीपासून पदवीपर्यंतच्या एकूण ६७ गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचाही शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच समाजाच्या विविध स्तरांवर कार्यरत असलेल्या सर्व पाखाडी प्रमुखांचाही विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेत समाजाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

**मंत्रिमंडळ बैठकीत प्रकल्पाला मान्यता** | **प्रवाशांचा वेळ ५० टक्क्यांनी वाचणार**

# मिरा-भाईंदर ते वसई-विरार दरम्यान धावणार मेट्रो

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्था अधिक वेगवान करण्यासाठी राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मिरा भाईंदर ते वसई-विरार दरम्यानच्या मेट्रो १३ या नव्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे मिरा-भाईंदर आणि वसई-विरार हा संपूर्ण परिसर मुंबईशी थेट जोडला जाणार असून प्रवाशांचा वेळ तब्बल ५० टक्क्यांनी वाचणार आहे.

ठाणे आणि पालघर या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या या मेट्रो मार्गाची



अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे केली जाणार आहे. या संपूर्ण प्रकल्पाचा अंदाजित खर्च १७७२४.९९ कोटी रुपये इतका आहे. या मार्गाची एकूण लांबी २५.०३ किलोमीटर असून, त्यापैकी २१.७८ किलोमीटर मार्ग उन्नत तर ३.२५ किलोमीटर मार्ग भूमिगत असणार आहे. या मार्गावर एकूण १६ स्थानके प्रस्तावित असून त्यात १३ उन्नत आणि ३ भूमिगत स्थानकांचा समावेश आहे. हा मार्ग मीरा रोड, नायगाव, वसई, नालासोपारा आणि विरार या भागांना थेट जोडेल.

या प्रकल्पाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे वसई खाडीवर उभारला जाणारा भव्य एकत्रित पूल असणार आहे. पांजू बेटाला जोडणाऱ्या ४.९२ किलोमीटर लांबीच्या या पुलावर खाली ६ पदरी रस्ता आणि वर मेट्रो मार्ग असेल. प्रकल्पाचा मुख्य मेट्रो डेपो चिखल डोंगरी येथे प्रस्तावित आहे. हा मेट्रो मार्ग नायगाव, नालासोपारा आणि विरार उपनगरीय रेल्वे स्थानकांशी जोडला जाईल, तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस स्टेडियम येथे मेट्रो मार्ग ९ सोबत त्याची जोडणी केली जाणार आहे. सर्व स्थानकांवर फीडर बस सेवाही उपलब्ध करून दिली जाईल.

### कधीपर्यंत काम पूर्ण होणार?

प्रकल्पासाठी एकूण २४.८४ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार असून, येत्या ६ महिन्यांत भूसंपादन आणि पोहोच रस्ते तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. मान्यता मिळाल्यापासून पुढील पाच वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### प्रदूषण कमी होण्यास मदत

२०३१ पर्यंत या मार्गावरून दररोज सुमारे ४.४९ लाख प्रवासी प्रवास करतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या मेट्रोमुळे महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी होईल, तसेच इंधनाची बचत होऊन प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

## निवडक



### पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी

**पाताळगंगा :** कोकणातील बहुतांश शेतकरी शेती व्यवसायासोबत पशुपालनाचा व्यवसायही करतात. घरासमोर असलेले पशुधन शेतीच्या कामांसाठी तसेच दुग्ध व्यवसायासाठी उपयुक्त ठरत असल्याने शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाला त्याचा आर्थिक आधार मिळतो. त्यामुळे तालुक्यातील ग्रामीण भागात शेतीसोबत पशुपालनालाही विशेष महत्त्व आहे. पावसाळ्यात विशेष हिरवा चारा उत्पन्न होत असल्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी लागत आहे. पावसाळ्यात डोंगराळ भाग, माळराने तसेच शेताच्या बांधावर मोठ्या प्रमाणात हिरवेगार गवत उगवत असल्याने पशुधनासाठी मुबलक चारा उपलब्ध होतो. त्यामुळे पावसाळ्यातील साधारण तीन ते चार महिने गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटतो. मुबलक चारा मिळत असल्याने जनावरांचे आरोग्य चांगले राहण्याबरोबरच दूध उत्पादनातही वाढ होते. परिणामी दुग्ध व्यवसायालाही चांगला हातभार लागतो.



### नामफलकाचे अनावरण

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथे शनिवारी (दि.१५) जेष्ठ नागरिक संघ वाघ्रण, खारपेढांबेच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. १५ ऑगस्ट २०१८ रोजी या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. याला आठ वर्ष पूर्ण झाली. या निमित्ताने या फलकाचे अनावरण करण्यात आले. हे अनावरण करताना संस्थापक हेमंत पाटील, संस्थापक सल्लागार पत्रकार दिपक, यशवंत पाटील, अध्यक्ष विनायक म्हात्रे, पदाधिकारी वाय.बी. पाटील, रविकिरण पाटील, सचिव गणेश पाटील, सभासद राम भोईर, दशरथ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. आठ वर्षात संस्थेने सामाजिक, आरोग्यविषयक, स्वच्छतेविषयी, विद्यार्थी गुणगौरव, देशभक्तीपर त्याचबरोबर शासनाकडून जेष्ठांसाठी मिळणाऱ्या योजना, सुविधा याचा प्रचार, प्रसार करून मदत व लाभ मिळवण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले, असे मत संस्थापक सल्लागार पत्रकार दिपक पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.



### प्रशस्तीपत्रके देऊन विद्यार्थ्यांचा सन्मान

**वाघ्रण :** अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथे शनिवारी (दि.१५) बाल सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राजिप शाळा वाघ्रण आणि वाघ्रण खारपेढांबे अंगणवाडी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्रामुख्याने १ ऑगस्ट २०२६ रोजी घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील अनुक्रमे मंथन पाटील, संवेद पाटील, सौम्या धोदरे, दुसऱ्या गटात वेदीका पाटील, आरोही पाटील, तर मोठ्या गटात वैदही पाटील, प्रित पाटील आणि भव्य पाटील, तर उत्तेजनार्थ ओम पाटील यांना रोख रक्कम आणि प्रशस्तीपत्रके देऊन सन्मानित करण्यात आले. तर शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थी ओम पाटील यांस शिक्षण तज्ञ सदस्य कृष्णकांत पाटील आणि सरपंच राजेंद्र पाटील यांनी रोख रक्कम देऊन सन्मानित केले. यावेळी सहभागी सर्व विद्यार्थ्यांनादेखील राहूल आत्माराम पाटील यांच्यावतीने प्रशस्तीपत्रके देण्यात आली.

### जनआरोग्य समितीची सभा



**आपटा :** आपटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे जनआरोग्य समिती यांची सभा नुकतीच पार पडली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर व अन्य पदाधिकारी हजर होते. यावेळी आपटा आरोग्य केंद्रासाठी तीन संगणक एक लॅपटॉप तसेच पाण्याची टाकी स्वच्छ करणे, गॅस शेगडी दुरुस्ती करणे, रुग्णांसाठी गरम पाण्याची सुविधा देणे, इन्वर्टर दुरुस्त करणे, प्रसुती कक्षासाठी एक एअर कंडिशनर उपलब्ध देणे, शस्त्रक्रिया कक्षामध्ये एयर कंडीशन सर्विसिंग करून घेणे, प्राथमिक आरोग्य केंद्रमध्ये पेस्ट कंट्रोल करणे, खुर्च्या देणे व आरोग्य केंद्राचे फायनल ऑडिट करणे इलेक्ट्रिकल ऑडिट करणे, स्ट्रक्चरल ऑडिट करणे आणि आरोग्य केंद्र आणि दोन बीपीची उपकरणे मान्य केले आहेत. प्रयोगशाळा तंत्रज्ञान कक्षाची दुरुस्ती करणे आणि आरोग्य विभागाची जे फर्निचर दरवाजे खराब होते ते दुरुस्ती करणे अशा अनेक गोष्टीवर चर्चा झाली. तसेच, याबाबत ही कामे लवकर सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### विरेश मोडखरकर अध्यक्षपदी




**उरण :** उरण तालुका मराठी पत्रकार संघाचा ४१वा वर्धापन दिन आणि वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि.१५) पत्रकार संघाच्या कार्यालयात उत्साहात पार पडली. यावेळी सभेच्या अध्यक्षस्थानी संजय गायकवाड होते. प्रारंभी संघाचा ४१वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्यानंतर संघाच्या विविध विषयांवर चर्चा करून आगामी काळातील कामकाजाची दिशा आणि रणनीती निश्चित करण्यात आली. यावेळी नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी विरेश मोडखरकर, उपाध्यक्षपदी दिलीप कडू, वैशाली कडू व नमिता गायकवाड, कार्याध्यक्ष घन:श्याम कडू, सचिव रा.उ. म्हात्रे, सहसचिव अजित पाटील, खजिनदार सुयोग गायकवाड, सह-खजिनदार महेश गायकवाड, सहसचिव दुर्वा गायकवाड, सदस्य हसमुख भिंडे, प्रविण कोलापटे यांची निवड करण्यात आली. तसेच मुख्य सल्लागारपदी दा.चां. कडू व संजय गायकवाड, तर कायदेशीर सल्लागारपदी अ‍ॅड. संघश्री गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

## निवडक

### श्रावणात भाज्यांच्या मागणीत वाढ



**तळा** : श्रावण महिना सुरू असल्याने तळा बाजारपेठेत भाज्यांना मोठी मागणी वाढली आहे. श्रावण हा हिंदू धर्मातील पवित्र महिना असल्याने बहुतांश नागरिक श्रावणात उपवास करतात. जवळपास महिनाभर मटण, मच्छी वर्ज्य असल्याने नागरिक पालेभाज्या खाण्यावर अधिक भर देतात. श्रावणापूर्वी गगनाला भिडलेले भाज्यांचे भाव श्रावण महिन्यात मात्र स्थिर आहेत.पाऊस दमदार झाल्याने तळा बाजारपेठेत गावठी भाज्यांची आवक देखील वाढली आहे. तालुक्यातील वावे, फळशेत, राणेचीवाडी, कर्नाळा, निगुडशेत या गावातील नागरिक मेथी, भेंडी, माठ, पालक, मुळा, मिरची, अशा असंख्य भाज्यांचा मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतात व घेतलेले भाज्यांचे पीक बाजारपेठेत विक्रीसाठी घेऊन येतात. श्रावणापूर्वी भाजी संपविण्यासाठी शेतकऱ्यांना दिवसभर बसावे लागते होते. परंतु श्रावणात भाज्यांना मागणी वाढली असल्याने अवघ्या काही तासात येथील शेतकऱ्यांजवळील भाजी संपते.गावठी भाज्यांच्या उत्पादनामुळे खेड्यातील नागरिकांना रोजगार देखील उपलब्ध झाला आहे.




### संतोष बुंदे यांना पुरस्कार

**नेरळ** : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचालित श्रमजीवी जनता विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज पोशीर या प्रशालेमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक पदावर कार्यरत असलेले संतोष निळकंठ बुंदे यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा, अतिशय सन्मानाचा 'भारतरत्न डॉ. सी.व्ही.रमण क्रियाशील प्रयोगशाळा सहाय्यक पुरस्कार २०२५-२६' नुकताच कोल्हापूर येथे शिक्षणमहर्ष डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३९ व्या स्मृतिदिनानिमित्त कार्याध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. बुंदे यांची ४११ शाखेमधून प्रयोगशाळा सहाय्यक प्रवर्गातून भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण क्रियाशील प्रयोगशाळा सहाय्यक पुरस्काराठी निवड होणे हे विद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि आश्वासक वाटचालीचे द्योतक म्हणावे लागेल. यापूवही बुंदे यांनी रायगड जिल्ह्यातील पोशीर सारख्या अतिशय दुर्गम आणि आदिवासीबहुल क्षेत्रात कार्य करतांना विविध प्रकारच्या तालुका, जिल्हास्तरावर विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांसह वैयक्तिक सहभाग नोंदवून विशेष प्राविण्यही प्राप्त केलेले आहेत.

### एड्स आजाराची जनजागृती

**रसायनी** : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग अलिबाग आणि ग्रामीण रुग्णालय चौक यांच्या संयुक्त विद्यमाने इंटिसिफाईड आय ई सी कॅम्पेनअभियाना अंतर्गत विश्व निकेतन महाविद्यालय धामणी येथे ११० विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य, मादक पदार्थ आणि त्याचे दुष्परिणाम एचआयव्ही, एड्स आजार जनजागृती कार्यक्रम व २०१७ एचआयव्हीची माहिती दिली. या कार्यक्रमाच्या वेळी प्राचार्य कदम व शिक्षक यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली आयसीटीसी-चौक समुपदेशक अशोक लोंढे यांनी एचआयव्ही एड्स आजार होण्याची कारणे, उपचार आणि हा आजार झाल्यावर घ्यावयाची काळजी ही माहिती दिली तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ विकास घुमरे हे देखील उपस्थित होते. तसेच कॉलेजने सहकार्य केल्याबद्दल कॅम्पेन अंतर्गत प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आले.

### ओसाड जागेला मिळणार हिरवाईचे रूप

**कर्जत** : पर्यावरण संवर्धनाबरोबरच गावातील उपलब्ध जागेचा विधायक उपयोग करून परिसर अधिक हिरवागार करण्याच्या उद्देशाने किरवली येथे श्री श्री रविशंकर ट्रस्टच्या माध्यमातून सुमारे २०० फळझाडांची लागवड करण्यात आली. गावामागील ओसाड जागेवर राबविण्यात आलेल्या या वृक्षारोपण उपक्रमाला ग्रामस्थ, महिला, लहान मुले तसेच ट्रस्टच्या सहकाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



किरवली गावामागील ओसाड जागेचा सदुपयोग व्हावा, परिसरात मोठ्या प्रमाणात हिरवाई निर्माण व्हावी, पर्यावरणाचे संवर्धन व्हावे आणि भविष्यात या फळझाडांमुळे ग्रामस्थांना फळांचा लाभ मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. वृक्षारोपणाच्या माध्यमातून केवळ झाडे लावण्यापुरते मर्यादित न राहता लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचा संकल्प यावेळी सहभागी नागरिकांनी केला. या उपक्रमात श्री श्री रविशंकर ट्रस्टचे सहकारी, किरवली ग्रामस्थ, महिला आणि लहान मुल तसेच राजेश खन्ना, वीणा आणि नीता, वनरक्षक पूनम वरखडे, रेखा चव्हाण तसेच किरवली ग्रामस्थ मंडळी, विवेक बडेकर, संजय बडेकर शरद पवार यांच बहुमोल सहकार्य लाभले.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- मेडिकल एजन्सी पिंपळभाट येथे(तत्काळ) कामासाठी मुले व मुलीसाठी ४ जागा खाली आहेत. शिक्षण १० ते १२ च्या पुढे, अलिबागच्या आजूबाजूच्या ६-८ कि.मी.परिसरातील स्टाफ हवेत. मो. ९६२३३६६७७८
- मराठी टायपिंगकरिता मुले व मुली पाहिजेत. संपर्क- ९८५०८११३९१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# पावसाळी तापाचा विळखा

**|| सर्दी, खोकला, अंगदुखीने रुग्ण त्रस्त || परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन**

**| उरण | प्रतिनिधी |**

सध्या पावसाळा सुरू असल्याने वातावरण बदलत आहे. अशातच ताप, डेंग्यूच्या रुग्णांत वाढ होत आहे. सध्या दिवस गणित २०० रुग्ण उपचार करुन घेण्यासाठी ये-जा करत आहेत. उरण तालुक्यातील नागरिकांनी पावसाळ्यात उद्भवणारे आजार टाळण्यासाठी आप आपला परिसर स्वच्छ ठेऊन पिण्याचे पाणी गरम करून पिण्यासाठी वापरावे तसेच लहान मुले किंवा नागरिक यांना आजाराची लक्षणे दिसून येताच त्यांनी आपल्या परिसरातील रुग्णालयात जाऊन तपासणी करून घ्यावी आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार सुरू ठेवावे असे आवाहन इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ बी. एम काळेल यांनी केले आहे.



जूनच्या तुलनेत जुलैमध्ये सर्दी, खोकला, अंगदुखी हिवताप, काविळ, डेंग्यू आणि इतर रुग्णांमध्ये वाढ झाली. ही वाढ ऑगस्टच्या पहिल्या १५ दिवसांतही कायम राहिली आहे. ऑगस्टमध्ये हिवतापाचे दिवस गणित २०० पेक्षा जास्त रुग्ण आढळून येत आहेत.

जूनमध्ये हिवतापाचे ४५० रुग्ण होते. जुलैमध्ये त्यांची संख्या १ हजार ३८० वर पोहोचली. ऑगस्टच्या पहिल्या १५ दिवसांत १ हजार १४२ रुग्णांची नोंद झाली. डेंग्यूचे रुग्ण जूनमध्ये ६६, जुलैमध्ये हा आकडा वाढला असून, ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात खासगी, शासकीय रुग्णालयात उपचार घेणारे डेंग्यूचे २४७ होते. ऑगस्टच्या पहिल्या १५ दिवसांत उरण तालुक्यात दिवस गणित उरण शहरात २०० ते तालुक्यात ७०० रुग्ण हे सर्दी खोकला अंगदुखी,

> उरण तालुक्यातील नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ ठेऊन, पिण्याचे पाणी गरम करून पिण्यासाठी वापरावे तसेच आजारांची लक्षणे दिसून येताच रुग्णालयातील डॉक्टरांकडून तपासणी करून उपचार करुन घेण्यासाठी पुढे यावे.
>
> - डॉ बी. एम. काळेल
> उरण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक

काविळ, ताप, डेंग्यू सह इतर आजारांवर उपचार करुन घेताना आढळून येत आहेत. यामध्ये लहान मुलांना वातावरणातील बदलामुळे सर्दी खोकला, ताप सारख्या इतर आजारांनी त्रस्त केले आहे.त्यामुळे सध्या उरण तालुक्यातील खासगी व शासकीय रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहेत.

# 'सुप्त गुणांचा शोध घेऊन ध्येय निश्चित करा'

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

आपल्यातील सुप्त गुणांचा शोध घेऊन योग्य ध्येय निश्चित करा आणि व्यक्तीमत्त्व समृद्ध करतानाच स्वत:सह समाजाच्या विकासासाठी योगदान द्या, असे प्रेरणादायी आवाहन एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. उज्वला चक्रदेव यांनी केले. एसएनडीटी विद्यापीठाच्या श्रीवर्धन आवारास दिलेल्या सदिच्छा भेटीदरम्यान त्या विद्यार्थिनींशी संवाद साधत होत्या. सोमवारी (दि. १७) ऑगस्ट रोजी पार पडलेल्या या विशेष कार्यक्रमात कुलगुरूंनी विद्यार्थिनींशी थेट सुसंवाद साधला. विद्यापीठाचा देदीप्यमान इतिहास उलगडताना त्यांनी उपलब्ध विविध शैक्षणिक व कौशल्याधारित संधींची सविस्तर माहिती दिली.




कुलगुरू चक्रदेव म्हणाल्या, की, केवळ पारंपारिक शिक्षण न घेता आवडीनुसार अभ्यासक्रम निवडून विविध कौशल्यांचा विकास करणे ही काळाची गरज आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. पी. राणे यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाने विविध उपक्रमांमधून मिळवलेल्या यशाचा, शैक्षणिक आलेखाचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका तृप्ती विचारे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## कोलाडमध्ये रानभाज्यांची आवक वाढली

**खांब** : पावसाळी हंगामात डोंगरमाथ्यावर तयार होणाऱ्या राधभाज्यांची आवक कोलाडमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढली असून या भाज्यांना खवय्यांची चांगली पसंती मिळत आहे. आरोग्यासाठी या भाज्या अत्यंत लाभदायक ठरत आहेत. त्यामुळे आदिवासी भगिनींना आपल्या हक्काचे उत्पन्नाचे साधन प्राप्त झाले आहे. संधीवात, मधूमेह व पोटाचे विकारांवर या लाभदायक ठरत असल्याचे आयुर्वेद तज्ञांचे मत आहे. टाकळा, भारंगा, कुडा, शेवळा आदी रानभाज्या सध्या विक्रीसाठी आणल्या आहेत. तर थोड्याच दिवसात तयार झाल्यावर भोवरीची व आळूची पाने, करटोळी यासह अन्य भाज्या विक्रीसाठी आणल्या जातील असे आदिवासी भगिनींचे म्हणणे आहे. तर बेसुमार होत चाललेली जंगलतोड, जंगलात लावले जाणारे वणवे यामुळे रानभाज्या शोधण्यासाठी खुप वेळ जातो.



## महिलेची हरवलेली बॅग सुरक्षित परत

**पनवेल** : कळंबोली परिसरात सापडलेली मौल्यवान बॅग प्रामाणिकपणे पोलिसांच्या स्वाधीन करून एका नागरिकाने समाजासमोर आदर्श निर्माण केला. अविनाश घोटणे यांना रस्त्यावर एक बॅग सापडली. त्यांनी कोणताही विलंब न करता ती कळंबोली पोलीस ठाण्यात जमा केली. बॅगेमध्ये तीन लाख रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन तसेच १,५०० रुपयांची रोख रक्कम होती. दरम्यान, बॅगेच्या मालक शर्वरी सावंत रा. कामोठे त्यांनी बॅगेची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी हरवलेल्या मोबाईलवर संपर्क साधला. त्यावेळी आवश्यक पडताळणीनंतर बॅग, त्यातील दोन्ही मोबाईल आणि रोख रक्कम त्यांच्या ताब्यात करण्यात आली.

# रोटरी क्लबतर्फे सायकलींचे वितरण

**| महाड | प्रतिनिधी |**

ग्रामीण व दुर्गम भागातील गरीब, गरजू तसेच होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांचा वेळ व श्रम वाचावा या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून रोटरी क्लब ऑफ महाडतर्फे शुक्रवारी (दि.१४) ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वितरण करण्यात आले. माजी सेक्रेटरी गुरुपाद कोंडगुळी यांच्या सौजन्याने रोटरी क्लब ऑफ महाडतर्फे चार विद्यार्थ्यांना सायकली देण्यात आल्या.




ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी दररोज मोठे अंतर पायी चालत जावे लागते. सायकल उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा शाळेत ये-जा करण्याचा वेळ वाचणार असून त्यांच्या शिक्षणाला निश्चितच चालना मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी या सुविधेचा योग्य उपयोग करून मन लावून शिक्षण घ्यावे आणि भविष्यात आपल्या कुटुंबाचे, समाजाचे तसेच देशाचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन रोटरी क्लब ऑफ महाडचे प्रेसिडेंट राजीव वनारसे यांनी केले. याप्रसंगी राजीव वनारसे, नितीन जोशी, अरुण गावडे, सुधीर मांडवकर, मधुकर मेहता, जगदीश भानुशाली यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# सापांविषयी 'समज-गैरसमजा'वर जनजागृती

**| उरण | प्रतिनिधी |**

नागपंचमीनिमित्त सर्पांविषयीचे समज-गैरसमज दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून जनजागृती करण्याच्या उद्देशाने फ्रेंड्स ऑफ नेचर सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था, चिरनेर-उरण, रायगड यांच्या वतीने 'साप-समज, गैरसमज आणि विज्ञान' या विषयावर तीन ठिकाणी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत रयत शिक्षण संस्थेचे मॉडर्न स्कूल, वाशी, नवी मुंबई येथे व्याख्याते तुषार म्हात्रे, कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन येथे जयवंत रामदास ठाकूर, तर पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोन येथे निकेतन ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सर्पांचे पर्यावरणातील महत्त्व, सपांविषयी प्रचलित गैरसमज व अंधश्रद्धा, सर्पदंशाची प्रतिबंधात्मक काळजी, योग्य प्रथमोपचार तसेच साप आणि मानव यांच्यातील सहजीवन याबाबत वैज्ञानिक माहिती देण्यात आली. सपाविषयीची अनावश्यक भीती दूर करून त्यांचे संवर्धन आणि मानवी सुरक्षितता यांचा समतोल साधण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. हा उपक्रम फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेच्या शून्य सर्पदंश मृत्यू अभियान या व्यापक जनजागृती उपक्रमाचा भाग असून, संस्थेच्यामार्फत सर्पदंशाच्या घटना कमी करण्यासाठी तसेच सर्पदंशामुळे होणारे मृत्यू टाळण्यासाठी वैज्ञानिक माहिती समाजापर्यंत पोहोचविण्यात येत आहे. या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी संबंधित शाळांचे मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



# मतदार यादी पुनरीक्षणाचा पहिला टप्पा पूर्ण

**| माणगाव | प्रतिनिधी |**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या सखोल मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमाचा पहिला टप्पा महाड विधानसभा मतदारसंघात १७ ऑगस्ट २०२६ रोजी पूर्ण झाला आहे. या प्रक्रियेंतर्गत मतदारांच्या नोंदींची तपासणी, गणना पत्रांचे संकलन तसेच मतदारांच्या नोंदींचे परस्पर जुळवणीचे काम करण्यात आले. महाड विधानसभा मतदारसंघातील या प्रक्रियेचा गोषवारा उपविभागीय अधिकारी महाड यांनी जाहीर केला आहे.

सखोल पुनरीक्षणा पूर्वी महाड विधानसभा मतदारसंघात २ लाख ९५ हजार ४४९ मतदार नोंदणीकृत होते. त्यापैकी २ लाख ४९ हजार ९८६ मतदारांची गणना पत्रे भरून प्राप्त झाली आहेत, तर ४५ हजार ४६३ गणना पत्रे प्राप्त झालेली नाहीत. प्राप्त गणना पत्रा पैकी १ लाख ७ हजार ८०० मतदारांची स्वत:च्या नोंदीशी जुळवणी झाली आहे. यापैकी २ लाख ४९ हजार ४७ गणना पत्रे प्रत्यक्ष कागदोपत्री पद्धतीने प्राप्त झाली असून, ९३९ गणना पत्रे संगणकीय पद्धतीने प्राप्त झाली आहेत. १ लाख २९ हजार ३३२ मतदारांच्या नोंदी पूर्वीच्या नोंदींशी जुळवण्यात आल्या आहेत, तर १२ हजार ८५० मतदारांच्या नोंदींची जुळवणी अद्याप झालेली नाही. मृत, स्थलांतरित आणि दुबार मतदारांच्या नोंदींची तपासणी पुनरीक्षणा दरम्यान मतदार यादीतील विविध प्रकारच्या नोंदींची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये १४ हजार ९ मतदार मृत, तर २४ हजार ७४८ मतदार कायमस्वरूपी स्थलांतरित असल्याचे आढळून आले आहे. तसेच ५ हजार १२२ दुबार मतदार, १ हजार ४३२ मतदार अनुपस्थित अथवा शोध न लागलेले, तर १५२ मतदार इतर प्रवर्गातील असल्याची नोंद करण्यात आली आहे. यामुळे मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने पुनरीक्षण प्रक्रियेला महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, ज्या मतदारांच्या नोंदीं बाबत जुळवणी झालेली नाही किंवा ज्यांची गणना पत्रे प्राप्त झालेली नाहीत, अशा मतदारांना पुढील टप्प्यात दावा व हरकत नोंदविण्याची संधी उपलब्ध राहणार आहे.

**ज्येष्ठ मतदारांची विशेष तपासणी**

मतदार यादीतील ८५ वर्षांवरील ज्येष्ठ मतदारांच्या नोंदींचीही विशेष तपासणी करण्यात आली आहे. या प्रक्रियेत विविध कारणांमुळे गणना पत्रे संकलित न होऊ शकलेल्या मतदारांच्या नोंदींची स्वतंत्र पडताळणी करण्यात आली असून, पडताळणी झालेल्या नोंदींचाही समावेश करण्यात आला आहे.



## ठाणा नाका रस्त्याची दुरवस्था

**खांदा कॉलनी** : महानगरपालिकेची विशेष अर्थसंकल्पीयसभा शुक्रवारी उत्साहात पार पडली. शहराच्या विकासासाठी विविध योजनांची घोषणा करण्यात आली. मात्र, त्याच दिवशी शहराच्या मध्यवर्ती ठाणा नाका येथील आदिवासी पाड्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. या मार्गावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून, मुसळधार पावसामुळे त्यामध्ये पाणी साचत असल्यामुळे वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

# रयत स्पर्धा परीक्षाचे उद्घाटन

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयामध्ये नुकताच रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमीचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. या समारंभासाठी महाराष्ट्र शासनाच्या राज्य विद्युत पारेषण विभागात जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. मिलिंद आवताडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन करताना डॉ. मिलिंद अवताडे म्हणाले की, शासकीय अधिकार मिळाल्यामुळे आपण समाजासाठी सकारात्मक बदल घडवू शकतो. संविधानाच्या जपणुकीसाठी या देशाला तुमच्यासारख्या सुजाण अधिकाऱ्यांची गरज आहे. भविष्यात भारताचे सुजलाम सुफलाम स्वरूप घडवायचे असेल तर स्पर्धा परीक्षेसाठी झोकून द्या व चांगले कुशल अधिकारी बना असा सल्ला त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी अविश्रांत मेहनत घेण्याचा सल्ला दिला.



या कार्यक्रमास एस. एस. अकॅडमीचे संचालक संदीप शेडगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, जफर शेख, हर्षद काबुगडे, सुरज सागर, डॉ. रमेश म्हात्रे, डॉ. लक्ष्मण गवळी उपस्थित होते.

**महादेव मंदिरात जलाभिषेक उत्साहात | 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला**

# रोह्यात शिवभक्तांची एकदिवसीय परिक्रमा

**| चणेरा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील शिवभक्तांच्या वतीने प्रथम श्रावणी सोमवारनिमित्त एकदिवसीय पंचक्रोशी परिक्रमेचे आयोजन करण्यात आले. परिसरातील स्वयंभू व प्राचीन शिवतीर्थांचे महत्त्व अधोरेखित करण्याबरोबरच धर्माचा प्रचार-प्रसार आणि तरुण पिढीत धार्मिक संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने या परिक्रमेचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात शिवभक्तांनी अनवाणी परिक्रमा पूर्ण केली.

पहाटे तळाघर येथील महादेव मंदिरात जलाभिषेक व संकल्प करून परिक्रमेचा शुभारंभ करण्यात आला.



त्यानंतर वाशी, लांढर, बोरघर, तळाघर, निवी, भुवनेश्वर, भुवनेश्वर येथील समस्त जंगम समाज मठ, गांगल मेडिकल परिसरातील ओंकारेश्वर मंदिर, दमखाडी, रोठ खुर्द, वाघेश्वर नगर येथील चौधरी यांच्या शिवमंदिर स्थळावरून रोठ बुद्रुक मार्गे पुन्हा तळाघर येथील महादेव मंदिरापर्यंत शिवभक्तांनी अनवाणी प्रदक्षिणा घालण्यात आली. परिक्रमेदरम्यान पंचक्रोशीतील विविध गावांमधील शिवलिंगांवर बेलपत्र अर्पण करून विधिवत जलाभिषेक करण्यात आला. प्रत्येक ठिकाणी शिवभक्तांनी श्रद्धेने पूजा-अर्चा केली. परिक्रमावासीयांचे गावागावांत ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. अनेक ठिकाणी चहा, फराळ व अल्पोपहाराची व्यवस्था करून ग्रामस्थांनी भक्तीभावाने सेवा केली. स्थानिक स्वयंभू तीर्थक्षेत्रांचा इतिहास, धार्मिक परंपरा आणि महत्त्व पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. परिसरातील धार्मिक स्थळांना व्यापक ओळख मिळावी, शिवभक्तांमध्ये एकोपा वाढावा आणि तरुण पिढीला आपल्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरांची जाणीव व्हावी, या उद्देशाने भविष्यात या परिक्रमेचे अधिक मोठ्या स्वरूपात आयोजन करण्याचा संकल्प शिवभक्तांनी व्यक्त केला.

**धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन**

परिक्रमेच्या मार्गावर विविध धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. काकड आरती, शिवभजन, सत्संग, हरिपाठ आणि आरतीमुळे संपूर्ण मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच तरुण शिवभक्तांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत शंभूमहादेवाच्या चरणी आपली सेवा अर्पण केली.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| संदिप दत्तात्रय गुरव | ९६ | १ | ०-९३-०० | ० | ८४ |
| सुरेश शंकर गुरव | यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर ७२ पॉ ०० मात्र. | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, **ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, मो.नं.९१५८२७७७२८
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१ दिनांक :-२०/०८/२०२६

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. प्रदीप प्रभाकर गावंड, राहणार विहिरीचा पाडा, वाघ्रण, नारंगी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. प्रदीप प्रभाकर गावंड यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| पेढांबे ता. अलिबाग. | १५२ | ०-०६-३० एकूण | १-४४ |

अलिबाग, सही/-
दिनांक : १५/०८/२०२६. **(ॲड. स्वप्निल सुधाकर पाटील )**
मु. एम. आय. डी. सी. रोड, वायशेत,
पो. नवगाव, ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत श्रीमती सुगंधा सुनिल पाटील, सुनयना सुनिल पाटील, सुरज सुनिल पाटील, विक्रांत सुनिल पाटील रा. कांदीवली- मुंबई, यांच्या मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाची बोलणी सदर मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेली आहे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| वरंडे, ता. अलिबाग जि. रायगड | २२ | ०-२०-४० पो.ख.०-०१-८० एकूण क्षेत्र ०-२२-२० | ५.०७ |
| | २३ | ०-४०-५० पो.ख. ०-०३-८० एकूण क्षेत्र ०-४४-३० | ९.६२ |

सदर जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतींवर कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
दिनांक : १९/०८/२०२६ **(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग
जि. रायगड, मो. ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व संबंधित व्यक्ती, संस्था आणि हितधारकांस सूचित करण्यात येते की, मौजे-कासेखोल, ता. तळा, जि. रायगड येथील खालील नमूद केलेल्या मिळकती ह्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी विक्री करण्याच्या ठरविलेल्या आहेत. तरी, खाली नमूद करण्यात आलेल्या मिळकतीबाबत जर कोणत्याही व्यक्ती, संस्था, ट्रस्ट, सहकारी संस्था, कुळधारक, खरेदीदार, मुद्रक, गहाणदार, तारणदार, भाडेकरू किंवा इतर कोणालाही कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, अडचण, अडथळा किंवा कोणतेही कायदेशीर संबंध असल्यास, तशा व्यक्तींनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत योग्य त्या लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सादर कराव्यात.

जर दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर जमीन मिळकत निर्विघ्न आणि निर्विवाद आहे असे मानले जाईल आणि त्यानुसार विक्री व्यवहार पूर्ण केला जाईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती विक्रेते आणि खरेदीदार यांचेवर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक राहणार नाहीत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कासखोल, ता. तळा, जि. रायगड**

| अ.क्र. | भूमापन क्र. | क्षेत्र | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १ | १४/१ | ८.७५.० | २.०६ |
| २ | १४/३ | ६.७०.० | २.५१ |
| ३ | १४/५/अ | २.००.० | ०.८४ |
| ४ | १४/६ | १.४९.० | ०.७५ |
| ५ | १४/७ | १.५४.० | ०.५० |
| ६ | २२/१ | ४.४९.० | १.८८ |
| ७ | २२/२ | २.०८.० | ०.७५ |
| ८ | २२/४ | ४.१२.० | १.५० |
| ९ | २२/५ | १०.१२.० | ५.१२ |
| १० | २२/८ | १.१६.० | ०.५० |
| ११ | २२/९ | ४.०२.० | १.२२ |

अलिबाग **ॲड. सचिन जोशी**
दि. २०/०८/२०२६ पत्ता- फ्लॅट नं. ३, दुसरा मजला साईलिला बिल्डींग
श्रीबाग नं. २ अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२६५३६५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. काशिनाथ पांडुरंग मोरे यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे विद्यमान मालक श्री.सोमेश्वर गणेश शिंदे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ. मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १११ | २ | ३४१-९७ | ३४-१९ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकविस दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दि. १९/०८/२०२६. **ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं. ९, समर्थ कृपा
हौसिंग सोसायटी नेरळ, महेश
टॉकीज जवळ, नेरळ ता, कर्जत,
जि. रायगड पिनकोड नं.४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.सुनिल अनंता कडव, श्री.भालचंद्र अनंता कडव, अमित अनंत कडव यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे भानसोली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २८/१ एकुण क्षेत्र १.९५.४० गुंठे पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र १.०३.४० जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २०/०८/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात

**कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम २९ (१) अन्वये पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस**

**नोटीस** दावा क्रमांक ०३/२०२६

१. श्रीम. रुक्मिणी विठोबा साटम (मयत)
१/१. श्रीम. शालिनी विठोबा साटम ऊर्फ श्रीम. रसिका रविंद्र माने
रा. वाघोडे, पो.पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड
१/२. श्री. किसन विठोबा साटम (मयत) वादी/ अर्जदार
१/२/१. श्रीम.अरुणा किसन साटम
१/२/२. श्री.वैभव किसन साटम
१/२/३. श्री.विशाल किसन साटम सर्व रा. मु. खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड.
१/२/४. श्रीम.रसिका राजेश शिंदे,
रा. भुवनेश्वर, निर्लोन कॉलनीसमोर, रोहा, ता.रोहा, जि.रायगड
१/३. श्रीम. सुवर्णा शिवाजी परब ऊर्फ श्रीम. नलिनी शिवाजी परब
रा. १५ अ, झालखंड, प्राथमिक शाळेजवळ, झालखंड,कामार्ले अलिबाग, जि. रायगड.

विरुध्द

१. श्रीम. प्रमिला नारायण पाटील
२. श्री. राजेंद्र नारायण पाटील
दोघेही रा. रुम नं. २०८, दुसरा मजला, पी.एन.पी.सो.,
पी. पी. पार्क, सुभाष नगर, पेझारी, पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड
१. श्री. विजय नारायण पाटील
रा. मु. पेढांबे, पो. नारंगी, ता. अलिबाग.
२. श्रीम. संगिता रविंद्र पाटील.
रा. हनुमान मंदिरा समोर, मु. चरी, पो. पोयनाड,
ता. अलिबाग, जि. रायगड
३. श्री. संजय नारायण पाटील
४. श्री. सत्यवान नारायण पाटील
दोघेही रा. पेढांबे, पो. नारंगी, ता. अ प्रतिवादी/सामनेवाला
५. श्रीम.सुकन्या अशोक पाटील
रा. व्यायाम शाळेजवळ, मु. चरी, पो. पोयनाड,
ता.अलिबाग, जि.रायगड
६. श्री. सुधीर नारायण पाटील
रा. पेढांबे, पो.नारंगी, ता.अलिबाग.
७. श्री. पांडुरंग कृष्ण पाटील

**विषय-** मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम २९ (२) प्रमाणे

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं.हि.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| मौजे पेढांबे, ता.अलिबाग | १२१(जुना स.नं. ७०) | ०-२६-०० | ६.०० |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम २९ नुसार स्वतः कसण्यासाठी मिळण्याबाबत व तथाकथीत कुळहक्क समाप्त होणेकरीता या न्यायालयात दि. ३०/०४/२०२६ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख ०९/०९/२०२६ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न राहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग सही/-
दिनांक :- १२/०८/२०२६ **(विक्रम पाटील)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण अलिबाग-रायगड**

## मुरुड जंजिरा नगरपरिषद

**दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान**

**"जाहीर आवाहन"**

**मुरुड जंजिरा नगरपरिषदेची तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणेकरीता सदस्य पदासाठी इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत**

पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३.४ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदेमध्ये "तक्रार निवारण में विवाद निर्णय समिती" स्थापन करण्याबाबत नमूद केले आहे.

त्यानुसार सदर समितीत एक अध्यक्ष आणि इतर दोन व्यावसायिक अनुभवी सदस्य यांची समिती बनलेली असेल अशी तरतूद आहे. "तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीच्या अध्यक्ष व सदस्यांचा कालावधी पाच वर्ष इतका असेल. सदर "तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीमध्ये खालील अर्हता व अनुभव असलेल्या व्यक्तींकडून सदस्य या पदासाठी, अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | पदसंख्या | अ.क्र | अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य | २ | १ | सदर व्यक्ती ३५ वर्षाहून अधिक वयाची असेल परंतु ६५ वर्षापेक्षा अधिक वयाची नसेल |
| | | २ | सदर व्यक्ती मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्नातक पदवी धारण करीत असेल |
| | | ३ | सदर व्यक्तिला स्थानिक प्राधिकरणांमधील कामाचा अनुभव असेल व शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल |
| | | ४ | सदर व्यक्ती कार्यकुशल, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यांमधील अथवा पथविक्रेत्यांची किंवा सार्वजनिक कामाशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी सबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षाचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल |

तरी, पात्र इछुक व्यक्तींनी आपले अर्ज दिनांक २८/०८/२०२६ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह मुरुड जंजिरा नगरपरिषद आवक- जावक विभागात सादर करावेत. याविषयी अधिक माहितीसाठी मुरुड जंजिरा नगरपरिषद दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालय येथे संपर्क साधावा.

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगपरिषद**

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**
म.रा.र.वि.म.
कोहिनूर स्क्वेअर, २१ वा, २२ वा आणि २३ वा मजला, सेंट्रल टॉवर, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम), मुंबई – ४०००२८. **दूरध्वनी:** ०२२– २६५१७९७१, **संकेतस्थळ:** www.msrdc.in **ई–निविदा पोर्टल:** www.mahatenders.gov.in

**शुद्धिपत्रक**

**क्रमांक म.रा.र.वि.म./वि.नि.प्रा./१९ वि.कें./वि.यो./२०२६/**

**वाचा –**१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, शासन अधिसूचना क्र. टीपीएस–१२२४/२०७८/ प्र.क्र.१३/२५/नवि–१२, दि.१९/०६/२०२५.
२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) च्या अनुषंगाने कलम २३ (१) नुसारची सूचना क्र.म.रा.र.वि.म./वि.नि.प्रा./१९ वि.कें/वि.आ./२०२५/४१२६, दि.१८/१२/२०२५.

ज्याअर्थी, वाचले सदरातील क्र.१ येथील अधिसूचनेन्वये **(यापुढे उक्त अधिसूचना असे निर्देशित)** त्यात नमूद केल्याप्रमाणे कोकण विभागातील १९ ग्रोथ सेंटरसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) म्हणजे म.रा.र.वि.म. ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) च्या अनुषंगाने कलम २३ (१) अन्वयेची प्रारुप विकास योजना तयार करण्याबाबतच्या इराद्याची वाचले सदरातील क्र.२ येथील सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी उक्त सूचनेमध्ये काही त्रुटी दुरुस्त करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, उक्त सूचनेस खालीलप्रमाणे शुद्धिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**शुद्धीपत्रक**

| अ.क्र. | या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|---|
| सूचनेमधील परिच्छेद क्र.१' | ''......१९ ग्रोथ सेंटरसाठी (या पुढे 'उक्त अधिसूचित क्षेत्र' म्हणून संदर्भित) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) (यापुढे ''उक्त महामंडळ'' असे निर्देशित) म्हणजे म.रा.र.वि.म. ची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा. असे निर्देशित) म्हणून नेमणूक केली आहे;'' | **''......१९ प्रभाव क्षेत्रांसाठी उक्त अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार एकूण ६९९ गावांसाठी** (या पुढे 'उक्त अधिसूचित क्षेत्र' म्हणून संदर्भित) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) (यापुढे ''उक्त महामंडळ'' असे निर्देशित) म्हणजे म.रा.र.वि.म. ची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा. असे निर्देशित) म्हणून नेमणूक केली आहे;'' |
| सूचनेमधील परिच्छेद क्र.५ (शेवटचा परिच्छेद) | ''.........असलेल्या क्षेत्राची सिमा दर्शविणारी उपरोक्त योजनांच्या प्रती.........'' | ''.........असलेल्या **१९ प्रभाव क्षेत्रांसाठी उक्त अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार एकूण ६९९ गावांच्या** क्षेत्राची सिमा दर्शविणारी उपरोक्त योजनांच्या प्रती...'' |

**संचालक मंडळ यांच्या आदेशानुसार,**
**दिनांक: १८/०८/२०२६** **सही/–**
**(अनिलकुमार ब. गायकवाड)**
**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, (म.रा.र.वि.म.)**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र.अर्ज ७२/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री.अब्दुस सलाम अहमद कडू
रा. सायगाव, ता. मुरुड-जंजिरा, अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत वावडूंगी,
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. २८-०६-१९७२ रोजी मौजे सायगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत वावडूंगी, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी. अर्जदार यांचा दि. २८-०६-१९७२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयांत दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.
आज ता.३१/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे ढोकशेत, ता. सुधागड, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक अनिशा अविनाश चिंतावर यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १६० | ० | १-९६-९० पैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-२८-०० | ०-४३ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २०/०८/२०२६ **ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू
बिल्डींग, तळ मजला, दिवाणी
व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे पाच्छापूर ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे पाच्छापूर ता. सुधागड जि. रायगड**

**मिळकतीचे वर्णन :-**

| कब्जेदाराचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.गणेश लक्ष्मण कानडे | ३१४ | ७-१९-७० पैकी विक्री क्षेत्र ०-२०-०० | ४-८३ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्रीबाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधित तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण पाली - सुधागड सही /-
दिनांक -१९/०८/२०२६ **श्री.राहुल जे.भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता.सुधागड जि.रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे व तशी बोलणी आमच्या अशिलानी केली आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करतील. दिलेल्या मुदतीत हरकत न घेतल्यास मागावून आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे माणगाव तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | हे आर चौ.मी | रुपये | पैसे |
| श्री.अनंत बाबुराव बोबे | ८३/१/क | ०.३७.५० ०.०५.५० ०.४३.०० | १.७० | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही /-
कार्यालयीन पत्ता: शॉप नं.१०, तळमजला,
पंकज रेसिडेन्सी, आगरी समाज हॉलच्या बाजूला, **ॲड श्री जयेंद्र पांडुरंग कराळे**
नेरळ साई मंदिर, नेरळ ता.कर्जत, दिनांक :- २०/०८/२०२६
जि.रायगड. ४१०१०१ मो.नं.९२२२५२२२९२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वाली ता. रोहा, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीचे मालक/कब्जेदार यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पैसे.) |
|---|---|---|---|
| वाली, ता.रोहा | ३६१ | ०-१६-७० पो.ख.०-०१-२० एकुण ०-१७-९० | २.८१ |

वर नमुद केलेल्या सदर बिनशेती मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्यावर ती बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

अलिबाग, **ॲड. सचिन दिनकर पाटील**
तारीख : १९/०८/२०२६ बी.ए.एल.एल.बी
मुंबई २१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९२२६८७२६९०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चौल, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, अलिबाग यांचेकडून लिलावाद्वारे खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**:: मिळकतीचे वर्णन ::**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) | भुधारणा पद्धत |
|---|---|---|---|---|
| चौल | १३५५/१५ | ०-१०-८० | ४.५८ | वर्ग-१ |

सदरहू मिळकत सौ.प्रतिक्षा प्रवीण राऊत यांचे नावे सातबारा सदरी नोंद असून सद्यस्थितीत आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, अलिबाग यांनी योग्य त्या कायदेशीर प्रकीयेचा अवलंब करून सदर मिळकत जप्त करून ताब्यात घेतलेली आहे. आमचे अशिलांनी सदर मिळकत आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, अलिबाग यांचेकडून लिलावाद्वारे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

तथापी सदर मिळकतीत आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, अलिबाग यांचेव्यतिरीक्त अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदरचा विक्री व्यवहार पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग सही /-
दिनांक : १९/०८/२०२६ **ॲड. मयुरी अनिल वाकासकर**
पत्ता : नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं. : ८८८८२९९१६६

## वाचकांसाठी निवेदन


कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### गतका खेळाची निवड चाचणी

**अलिबाग :** गतका असोसिएशन ऑफ रायगड या संघटनेच्यावतीने रविवारी (दि.९) अलिबाग येथे जिल्हास्तरीय गतका खेळाची निवड चाचणी स्पर्धा घेण्यात आली. यावेळी संपूर्ण जिल्हाभरातून जवळपास ७३ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांची लोणावळा येथे दि.२६ते२८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या गतका असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या राज्य स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. दरम्यान, या स्पर्धेचे उद्‌घाटन खेलो इंडिया युथ गेम गतका रॉप्यपदक विजेती श्रमिका पाटील आणि तन्मई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. बक्षीस समारंभाच्या वेळी उपस्थित नॅशनल युथ गेम खेळाडूमानसी पाटील, राष्ट्रीय महिला पंच वेदिका कवळे, राष्ट्रीय कबड्डी पंच पुरुषोत्तम पिंगळे, सामाजिक कार्यकर्त्या सायली म्हात्रे, कराटे ब्लॅक बेल्ट राष्ट्रीय कोच निकिता थळे, संघटनेचे अध्यक्ष संतोष कवळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि पदक देऊन गौरवण्यात आले.

### ‘तुला आयपीएलमध्ये घेऊन जाईन’

**नवी दिल्ली :** भारतीय संघाने पहिल्या कसोटीत १६५ धावांनी विजय मिळवून श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. मात्र, या सामन्यातील एक व्हिडीओ सध्या सोशल मीडिया गाजवत आहे. त्यात भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल हा श्रीलंकेच्या निरोशन डिकवेला याला आयपीएलमध्ये घेऊन जाईन, असे सांगताना ऐकू येत आहे. या दोन्ही खेळाडूंमधील मजेशीर संवाद सध्या नेटिझन्सच्या चर्चेचा विषय ठरला आहे. श्रीलकेंचे निरोशन व सोनम यांनी पहिल्या डावात १४६ धावांची विक्रमी भागीदारी केली होती. त्यामुळे ही जोडी टिकू न देण्यासाठी यशस्वीने नुकताच आलेल्या निरोशनचे लक्ष विचलित करण्याचा हा डाव आखल्याचे बोलले जात आहे. तो म्हणाली की, ‘‘कम ऑन, यार! तू पहिल्या डावात खूप मोठे फटके मारले होते. आम्हाला आताही तसेच फटके पाहायचे आहेत. तू पॉइंट ते स्केअर लेग क्षेत्रात फटके खेच. तुझ्यात ताकद आहे, तू करू शकतो’’, असे तो म्हणाला. त्यावर निरोशनने ‘‘मला आयपीएलमध्ये घेऊन चल, तरच मी फटके खेचेन’’ असे म्हणाल्यावर यशस्वीने, ‘‘आम्ही नक्कीच, १०० टक्के... चल आता षटकार खेच आणि मी तुला आयपीएलमध्ये घेऊन जाईन’’, असे बोलला.

### आयसीसीची ताजी क्रमवारी जाहीर

नवीदिल्ली : भारतीय संघाने नुकतेच बुधवारी श्रीलंका क्रिकेट संघाला कसोटी मालिकेतील गॉलला झालेल्या पहिल्या कसोटीत पराभवाचा धक्का दिला. याशिवाय दोन दिवसांपूर्वी बांगलादेश क्रिकेट संघानेही ऑस्ट्रेलियाला डार्विल कसोटीत पराभूत करत मोठा उलटफेर केला होता. या सामन्यानंतर आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने ताजी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. या सामन्यांपूर्वी ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर ट्रॅव्हिस हेड फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल क्रमांकावर होता; मात्र, बांगलादेशविरुद्ध त्याला २२ आणि १७ धावाच करता आल्याने पहिला क्रमांक गमवावा लागला आहे. त्यामुळे इंग्लंडच्या हॅरी ब्रुकने पुन्हा पहिला क्रमांक मिळवला असून, जो रुट दुसऱ्या आणि स्टीव्ह स्मिथ तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. दरम्यान, पहिल्या १० फलंदाजांमध्ये भारताचा कर्णधार शुभमन गिल आणि यशस्वी जैस्वाल आहेत. गिल आणि जैस्वाल ७ व्या क्रमांकावर आहेत. रिषभ पंतने दुसऱ्या डावातील अर्धशतकानंतर एक स्थानाची प्रगती केली असून तो १३ व्या क्रमांकावर आहे. गोलंदाजांच्या क्रमवारीत जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेचा भाग नाही. परंतु, असे असले तरी त्याने अव्वल क्रमांक कायम ठेवण्यात यश मिळवले आहे. याशिवाय ऑस्ट्रेलियाविरुद्ध दमदार गोलंदाजी करणाऱ्या मेहदी हसन मिराज आणि हसन मोहमुद यांनी मोठी झेप घेतली आहे. तो २४ व्या क्रमांकावर आला आहे, तर हसन मेहमुद ३८ व्या क्रमांकावर आला आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स आणि नॅथन लायन यांची घसरण झाली आहे. कमिन्स ५ व्या क्रमांकावर घसरला असून लायन १२ व्या क्रमांकावर घसरला आहे. गोलंदाजांमध्ये बुमराह पाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर न्यूझीलंडचा मॅट हेन्री आहे, तर तिसऱ्या क्रमांकावर मिचेल स्टार्क आहे. पहिल्या १० गोलंदाजांमध्ये बुमराह एकमेव भारतीय आहे. त्याच्यानंतर १४ व्या क्रमांकावर कुलदीप यादव आहे. तसेच, अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत रवींद्र जडेजा अव्वल क्रमांकावर कायम आहे.

# लंकेत भारतीय संघाचा डंका

- पहिल्या कसोटीत श्रीलंकेचा फडशा
- मालिकेत १-० ने आघाडी

**। गॉल । प्रतिनिधी ।**

भारतीय संघाने श्रीलंका दौऱ्याची दणकेबाज सुरुवात करत गॉल येथील पहिल्या कसोटी सामन्यात १६५ धावांनी विजय नोंदवला. अंतिम दिवशी श्रीलंकेला विजयासाठी कठीण आव्हान मिळाले होते; परंतु, भारतीय गोलंदाजांच्या शिस्तबद्ध आणि भेदक माऱ्यासमोर यजमान संघाचा दुसरा डाव २०६ धावांवर आटोपला. या विजयासह भारताने दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली असून, कसोटी विश्वचषक अजिंक्यपदाच्या गुणतालिकेतही आपले स्थान अधिक मजबूत केले आहे.



भारताने पहिल्या डावात ४६२ धावा केल्या होत्या. या डावात देवदत्त पडिक्कलने शानदार फलंदाजी करत १६७ धावांची दमदार खेळी केली होती. त्याच्या संयमी आणि आक्रमक फलंदाजीमुळे भारताला मोठी धावसंख्या उभारता आली. तसेच, केएल राहुलने ८१ धावा, ध्रुव जुरेलने ५१ धावा, तर ऋषभ पंतने ३९ धावांचे योगदान दिले. श्रीलंकेकडून प्रभात जयसूर्याने ४ बळी घेतले, तर केशरा नुवान्थाने ३ फलंदाजांना बाद केले. त्यानंतर भारताच्या ४६२ धावांच्या प्रत्युत्तरात श्रीलंकेचा पहिला डाव २८४ धावांवर संपुष्टात आला. यावेळी डिकवेलाने ११५ चेंडूंचा सामना करत ८० धावा केल्या. तर, दिनुषाने तब्बल १६८ चेंडूंत १०० धावांची शतकी खेळी साकारली. त्याच्या खेळीत ४ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. मात्र, भारताकडून मानव सुथारने सर्वाधिक ४ बळी घेत श्रीलंकेच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. त्याला रवींद्र जडेजाने ३ बळी घेत उत्तम साथ दिली. तसेच, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा आणि कुलदीप यादव यांनी देखील प्रत्येकी एक बळी घेतला. त्यामुळे भारताला पहिल्या डावाततब्बल १७८ धावांची आघाडी मिळवता आली.

भारताने दुसऱ्या डावात १९३ धावा केल्या. यावेळी भारतासाठी ऋषभ पंतने (६६) सर्वाधिक धावा केल्या. तसेच, देवदत्त पडिक्कलनेही ४४ धावा केल्या. परंतु, यावेळी यशस्वी जैस्वालला आपले खाते उघडता आले नाही. केएल राहुलने पडिक्कलसोबत ६५ धावांची भागीदारी केली आणि ३५ धावांवर बाद झाला. कर्णधार शुभमन गिल विशेष प्रभाव पाडण्यात अपयशी ठरला आणि आठ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. श्रीलंकेसाठी असिथा फर्नांडोने ४ बळी घेतले. तर, प्रभात जयसूर्यानेही ३ बळी, लाहिरू कुमारने २ बळी आणि केशरा नुवान्थाने १ बळी घेतला. भारताने दिलेल्या ३७२ लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेने दुसऱ्या डावात चांगली झुंज देण्याचा प्रयत्न केला. सोनल दिनुशाने ८४ धावा केल्या, तर धनंजया डी सिल्वाने ५९ धावांची खेळी करत प्रतिकार केला. मात्र, भारतीय गोलंदाजांनी निर्णायक क्षणी विकेट्स मिळवत श्रीलंकेला पुनरागमनाची संधी दिली नाही. मानव सुथारने पुन्हा एकदा प्रभावी गोलंदाजी करत ५ बळी घेतले, तर प्रसिद्ध कृष्णाने २ बळी मिळवले.अखेर श्रीलंकेचा संपूर्ण डाव २०६ धावांवर संपला आणि भारताने सामना १६५ धावांनी जिंकला.

### गुणतालिकेत १२ गुणांचा फायदा

श्रीलंकेविरुद्धच्या गॉल कसोटीतील विजयामुळे भारताच्या खात्यात १२ गुणांची भर पडली आहे. सामन्यापूर्वी भारताचे ५२ गुण होते. आता हे गुण ६४ झाले आहेत. तसेच, भारताची विजयाची टक्केवारी म्हणजेच पीसीटी ४८.१५ टक्क्यांवरून ५३.३३ टक्क्यांवर पोहोचली आहे. मात्र, या शानदार विजयानंतरही डब्ल्यूटीसी गुणतालिकेत भारताच्या स्थानात बदल झालेला नसून, भारतीय संघ पाचव्या स्थानावरच कायम आहे.

# शालेय विद्यार्थ्यांच्या संधीवर गदा?

## नव्या नियमामुळे खेळाडू, पालकांमध्ये नाराजी

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवा नियम लागू करण्यात आला आहे. या नव्या नियमामुळे खेळाडू आणि पालकांमध्ये नाराजी निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने दि.२१ जुलै रोजी जारी केलेल्या पत्रात सन २०२६-२७ पासून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मंडळांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या खेळाडूंसाठी विशिष्ट खेळाच्या स्पर्धेबाबत महत्त्वाची अट नमूद केली आहे. या नियमानुसार सीबीएसई, नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय, विद्याभारती, आयसीएसई, आयबी इत्यादी मंडळांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याला एखाद्या विशिष्ट खेळात संबंधित शैक्षणिक मंडळामार्फत आयोजित स्पर्धा किंवा क्रीडा विभागामार्फत आयोजित शालेय स्पर्धा यापैकी केवळ एका ठिकाणीच सहभागी होता येणार आहे. मात्र, दुसऱ्या खेळाच्या प्रकारात क्रीडा विभागाच्या स्पर्धेत सहभागी होण्याची मुभा देण्यात आली आहे. या निर्णयामुळे एका खेळात आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी विविध व्यासपीठांवर संधी मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संधी मर्यादित होणार नाहीत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेषतः शालेय व मंडळाच्या स्पर्धांची रचना, पातळी आणि निवड प्रक्रिया वेगळी असताना विद्यार्थ्यांना दोन्ही स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी नाकारण्याचे कारण काय, याबाबत पालक व क्रीडा क्षेत्रातून स्पष्टीकरणाची मागणी होण्याची शक्यता आहे.

तसेच, एकाच खेळात संबंधित विद्यार्थी दोन्ही ठिकाणी सहभागी झाल्याचे सिद्ध झाल्यास त्या खेळाडूला किंवा संघाला त्या वर्षातील उर्वरित स्पर्धा तसेच आगामी वर्षातील स्पर्धांपासून वंचित ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. संबंधित शाळेवर कायदेशीर कारवाई करून तिला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई केली जाऊ शकते, असा स्पष्ट इशाराही पत्रातून देण्यात आला आहे. दरम्यान, याच पत्रात शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. शासनाच्या स्पर्धांमध्ये जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर सहभागी होणाऱ्या तसेच प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना दहावीमध्ये क्रीडा सवलत गुण, अकरावी प्रवेशात खेळाडू आरक्षण तसेच पात्र खेळाडूंना शासकीय व निमशासकीय नोकरीमध्ये पाच टक्के क्रीडा आरक्षणाचा लाभ मिळतो, असे नमूद आहे.

### माणगावात रंगणार फुटबॉलचा थरार

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील फुटबॉलप्रेमींसाठी उत्साहाची पर्वणी ठरणारी ‘माणगाव प्रीमियर लीग’ फुटबॉल स्पर्धा रविवारी (दि.२३) खर्डी येथील तालुका क्रीडा संकुलात रंगणार आहे. माणगाव फुटबॉल क्लबच्यावतीने आयोजित या स्पर्धेत स्थानिक तसेच परिसरातील फुटबॉल संघांना आपले कौशल्य, संघभावना आणि जिद्द दाखविण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेचे आयोजन ७+३ फॉरमॅटमध्ये करण्यात आले असून, स्पर्धेचा प्रारंभ लीग आणि त्यानंतर नॉकआउट पद्धतीने होणार आहे. त्यामुळे प्रत्येक सामन्यात विजयासाठी संघांना अखेरच्या क्षणापर्यंत झुंज द्यावी लागणार असून, फुटबॉलप्रेमींना चुरशीचे आणि रंगतदार सामने पाहण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेतील विजेत्या संघाला रोख रक्कम १० हजार रुपये आणि आकर्षक चषक, तर उपविजेत्या संघाला रोख रक्कम ५ हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय स्पर्धेत वैयक्तिक कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही विशेष पुरस्कार देण्यात येणार आहेत. स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू, सर्वोत्तम बचावपटू आणि सर्वोत्तम गोलरक्षक यांची विशेष पुरस्कारांसाठी निवड केली जाणार आहे. या फुटबॉल महोत्सवात सहभागी होण्यासाठी इच्छुक संघांनी आयोजकांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### घरच्या मैदानावर युवा खेळाडूंचा धुमाकूळ



**। जळगाव । प्रतिनिधी ।**

महाइनडोअर क्रिकेट असो.च्या मान्यतेने आणि जळगाव इनडोअर क्रिकेट असो.च्या दमदार आयोजनातून रंगलेल्या जुनिअर राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी इनडोअर क्रिकेट स्पर्धेचा समारोप युवा खेळाडूंच्या शानदार कामगिरीने झाला. यावेळी जळगावच्या युवा खेळाडूंनी घरच्या मैदानावर अक्षरशः धुमाकूळ घालत १५ आणि १३ वर्षांखालील दोन्ही गटांत विजेतेपदावर नाव कोरले. तर, १७ वर्षांखालील गटात नागपूरने बीडचा पराभव करून विजेतेपदावर मोहोर उमटवली.

यावेळी यजमान जळगावने ठाण्याचा ७९-२३ असा तब्बल ५६ धावांनी धुव्वा उडवत १५ वर्षांखालील मुलांच्या गटाचे अजिंक्यपद पटकावले. अंतिम सामन्यात जळगावच्या युगेंद्र भोळेने १९ धावा, स्मितेश शिंदेने १५ धावा व २ बळी, कार्तिक राजपालने १७ धावा व ३ बळी, तर अंश चौधरीने १२ धावा व १ बळी घेत जळगावच्या दणदणीत विजयात मोलाचा वाटा उचलला. ठाण्याकडून सौरव सुमनने १८ धावा, तर भाविक पवारने ९ धावा करत प्रतिकार केला. १७ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात नागपूरने बीडचा ११८-७४ असा ४४ धावांनी पराभव करत अजिंक्यपदावर कब्जा केला. नागपूरने या सामन्यात तब्बल ११८ धावा फटकावत स्पर्धेतील सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. या भक्कम धावसंख्येने नागपूरच्या विजयाचा पाया पहिल्याच डावात मजबूत केला. तर, १३ वर्षांखालील मुलांच्या अंतिम लढतीतही यजमान जळगावने साताऱ्याचा ४६ धावांनी धुव्वा उडवत विजेतेपद पटकावले. जळगावच्या युवा खेळाडूंनी सामन्यावर सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. दृविथ माळकरने २१ धावा व २ बळी घेत अष्टपैलू कामगिरी करत विजयाचा पाया मजबूत केला. त्याला वंश राजपालने ६ धावा करत चांगली साथ दिली. साताऱ्याकडून विराज आणि विनीत यांनी जिद्दीने सामना लढवण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना विजयापर्यंत मजल मारता आली नाही.

# दादरमध्ये रंगली चुरशीची धाव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दादर (पूर्व) येथे झालेल्या ‘शिवनेरी रोड रेस२०२६’ मध्ये युवा धावपटूंनी आपल्या वेगाची आणि जिद्दीची जोरदार छाप उमटवली. १६ वर्षांखालील मुलांमध्ये प्रेमकुमार पंडित, मुलींमध्ये डिनेल अल्मेडा; १४ वर्षांखालील मुलांमध्ये ईशान शर्मा, मुलींमध्ये जिदन्यासा गायकवाड; १२ वर्षांखालील मुलांमध्ये अनिकेत सोनार, मुलींमध्ये आरती यादव; तर १० वर्षांखालील मुलांमध्ये सत्यम गुप्ता आणि मुलींमध्ये वेदा पाटील यांनी प्रथम क्रमांक पटकावले.



शिवनेरी सेवा मंडळाच्यावतीने दि.१५ ऑगस्ट रोजी या रोड रेसचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत युवा धावपटूंनी विजयासाठी अक्षरशः जीवाचे रान केले. यावेळी १६ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रेमकुमार पंडित याने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. प्रियांशू कुमार याला द्वितीय, तर प्रिंस गोंद याला तृतीय क्रमांक मिळाला. याच वयोगटातील मुलींच्या शर्यतीत डिनेल अल्मेडा हिने अव्वल स्थान मिळवले. आरुशी गुप्ता दुसरी, तर त्रिशा गुप्ता तिसरी आली. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात ईशान शर्मा याने बाजी मारली. मयंक जयस्वाल याने द्वितीय, तर क्षितीज केणी याने तृतीय क्रमांक मिळवला. मुलींच्या गटात जिदन्यासा गायकवाड हिने सर्वांना मागे टाकत विजेतेपद पटकावले. स्वरा लाड दुसरी, तर दक्षता घोलप तिसरी ठरली. १२ वर्षांखालील मुलांमध्ये अनिकेत सोनार याने प्रथम क्रमांक मिळवला. आर्यन परवाडी द्वितीय, तर अंशुमन भिडे तृतीय ठरला. मुलींच्या गटात आरती यादव हिने विजेतेपदावर नाव कोरले. श्राव्या मयेकर हिने दुसरा, तर अन्वी कोलते हिने तिसरा क्रमांक मिळवला. तसेच, सर्वात लहान १० वर्षांखालील मुलांच्या गटात सत्यम गुप्ता याने अव्वल स्थान पटकावले. श्रीराज करमाळकर दुसरा, तर शोर्यम सालेकर तिसरा ठरला. मुलींच्या गटात वेदा पाटील हिने प्रथम क्रमांक मिळवत विजेतेपदाचा आनंद लुटला. त्विषा परब हिने द्वितीय, तर सिद्धी शिंदे हिने तृतीय क्रमांक मिळवला.

# दहा बळी घेऊनही उत्कृष्ट खेळाडू नाही

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय श्रीलंकेविरुद्धचा पहिला कसोटी सामना जिंकला. यावेळी फिरकीपटू मानव सुथारने १० बळी घेतले. परंतु, त्याला प्लेअर ऑफ दी मॅचचा पुरस्कार दिला गेला नाही. तो दुसऱ्याच खेळाडूला मिळाला. ३७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेची दमछाक झाली आणि त्यांना २०६ धावांवर गाशा गुंडाळावा लागला. मानवने २३.४-२-५५-६ अशी अप्रतिम स्पेल टाकली आणि सामन्यात १० बळींच टप्पा पूर्ण केला. आर अश्विन (दोनदा), बिशन सिंग बेदी, एरापल्ली प्रसन्ना, भगवत चंद्रशेखर, अनिल कुंबळे आणि हरभजन सिंग यांच्यानंतर परदेशात कसोटी सामन्यात १० बळी घेणारा मानव सुथार हा सातवा भारतीय फिरकी गोलंदाज ठरला आहे. त्याने वयाच्या २४ वर्षे १६ दिवसांचा असताना हा पराक्रम केला आणि वयाच्या २८ वर्षांपूर्वी ही कामगिरी करणारा तो एकमेव खेळाडू आहे. यावेळी मानव सुथारने जरी सामन्यात १० बळी घेऊन अनेक पराक्रम केले असले तरी देवदत्त पडिक्कलने मॅच गाजवली. त्यामुळे त्याला प्लेअर ऑफ दी मॅच पुरस्कार दिला गेला.





दुसऱ्या सामन्यात अफलातून खेळ | दक्षिण आफ्रिकेवर ६-१ ने मात

# भारतीय महिला हॉकी संघाची कमाल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

हॉकी विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला हॉकी संघाने कमालीचा खेळ केला आहे. पहिल्या सामन्यात चीनला बरोबरीत रोखल्यानंतर दुसरा सामना मंगळवारी (दि.१८) दक्षिण आफ्रिका महिला संघाविरुद्ध झाला. या सामन्यात भारतीय महिलांनी अफलातून खेळ करत संपूर्ण सामन्यात वर्चस्व ठेवले आणि दणादण गोल केले. भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला ६-१ अशा गोलफरकाने पराभूत करत पुढच्या फेरीतील प्रवेश जवळपास पक्के केले आहे.



या सामन्यात भारतीय संघाने आक्रमक सुरुवात केली. मात्र, चौथ्या मिनिटाला दक्षिण आफ्रिकेला पेनल्टी कॉर्नर मिळाला. परंतु, भारतीय बचावफळीने गोल होऊ दिला नाही. त्यानंतर भारतीय संघाने सातत्याने गोल करण्याचा प्रयत्न केला. अखेर ११ व्या मिनिटाला साक्षीने शॉट मारण्याचा प्रयत्न केला; परंतु, चेंडू ड्रिबल करत फार-पोस्टच्या दिशेने गेला आणि सुनेलिता टोपोने सहज मैदानी गोल करत भारताचे खाते उघडले. त्यामुळे पहिल्या क्वार्टरमध्ये भारताने १-० अशी आघाडी घेतली होती.

दुसऱ्या क्वार्टरच्या सुरुवातीलाच १७ व्या मिनिटाला भारतासाठी पेनल्टी कॉर्नरवर नवनीतने गोल करत भारताची आघाडी २-० अशी वाढवली. याच क्वार्टरमध्ये २५ व्या मिनिटाला भारतासाठी तिसरा गोल आला. दीपिकाच्या ड्रॅगफ्लिकवर सुशिलाने हा गोल केला. त्यामुळे दुसऱ्या हाफमध्ये भारताने ३-० अशी मोठी आघाडी घेतली होती. तिसऱ्या क्वार्टरमध्येही दक्षिण आफ्रिकेकडून भारताला रोखण्याचे प्रयत्न सुरू होते, मात्र ३८ व्या मिनिटाला भारताचा चौथा गोलही झाला. हा गोल दीपिकाने केला. त्यानंतर अखेरीस ४४ व्या मिनिटाला लालरेम्सियामीने भारतासाठी पाचवा गोल केला, तर ४५ व्या मिनिटाला साक्षीकडून आणखी एक गोल झाल्याने भारताने ६-० अशी आघाडी घेतली. मात्र, अखेरच्या क्वार्टरमध्ये भारतीय संघ बचाव करताना दिसला, तसेच दक्षिण आफ्रिकेने आणखी गोल होण्यापासून भारतीय संघाला रोखले. अखेर ५५ व्या मिनिटाला दक्षिण आफ्रिकेने गोलचे खाते उघडले. कायला डी वालने पेनल्टी कॉर्नरवर गोल केला. मात्र, भारताने घेतलेल्या आघाडीमुळे हा सामना सहज जिंकला. आता भारतीय संघाला इंग्लंडविरुद्ध दि.२० ऑगस्ट रोजी सामना खेळायचा आहे.

कु. मनश्री रुपेश पाटील
मु. पेढांबे, अलिबाग, रायगड
जन्मदिनांक :- २०-०८-२०२०
हिस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
आई,बाबा, आत्या, मामी, मामा, कैवल्य

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)